www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक युवक आधार
मराठी


दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ | अंक : 272 | वा सोमवार दि. 16 जून २०२५ | किंमत : 2 रु | पृष्ठ : ४

# कुंडमळा पूल दुर्घटनेत ४ जणांचा मृत्यू, सरकारतर्फे मृतांच्या कुटुंबाला पाच लाख रुपयांची मदत जाहीर

पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवर कुंडमळ्यात पूल कोसळून मोठी दुर्घटना घडली असून यात अनेक पर्यटक वाहून गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. रविवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास सदर दुर्घटना घडली असल्याचे समोर आले आहे. एनडीआरएफ, पोलीस यांच्या मदतीने बचाव कार्य सुरू आहे. सुमारे ३० ते ४० जण नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची भीती वर्तविण्यात येत आहे. रविवारी रात्री उशीरा चार जणांचा मृतदेह आढळून आला. दोन दिवसांपासून मावळ परिसरात मुसळधार पाऊस कोसळत असून इंद्रायणीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे. यामुळे नदीत पडलेल्या पर्यटकांना वाचविण्याचे शर्थीचे प्रयत्न यंत्रणांकडून सुरू आहेत.



**राज्य सरकारकडून पाच लाख रुपयांची मदत**

राज्याचे जलसंपदा तथा आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी कुंडमळा येथील दुर्घटनास्थळाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. कुंडमळा पूल दुर्घटनेतील मृत्यू पावलेल्या कुटुंबियांना सरकारकडून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जखमींच्या उपचारांचा खर्च शासनातर्फे केला जाईल, असेही ते म्हणाले.

**सेल्फीच्या नादात जीव धोक्यात घालू नका**

पुलावर एकाचवेळी अनेक पर्यटक फोटो काढण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करून जमले होते, असे मंत्री गिरीश महाजन म्हणाले. पर्यटकांनीही आपल्या जीवाची काळजी घेणे गरजेचे आहे. सेल्फीसाठी पर्यटकांनी आपला जीव धोक्यात घालू नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

इंद्रायणी नदीचा वेगवान प्रवाह आणि काळोख असूनही NDRF ची बचाव मोहीम सुरू; ४ जणांचे मृतदेह आढळले इंद्रायणी नदीवरील पूल दुर्घटनास्थळी युद्धपातळीवर शोध आणि बचाव कार्य सुरू आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी घटनास्थळी उपस्थित आहेत. एनडीआरएफचे पथक पाण्याचा वेगवान प्रवाह, काळोख असे अडथळे पार करत बचाव मोहीम राबवत आहेत. पुण्यातील कुंडमळ्यातील पूल कोसळल्याची घटना कशामुळे घडली? आमदार शेळकेंनी सांगितलं कारण; म्हणाले, "एकाचवेळी पर्यटक" मावळ तालुक्यातील इंद्रायणी नदीवरील कुंडमळ्यात पूल कोसळल्याची घटना घडली आहे. या घटनेत २ जणांचा मृत्यू झाला असून ६ जण गंभीर जखमी झाले आहेत.

## दृष्य सत्य
### जनतेच्या नजरेतून
#### शासनाच्या दरबारात

### महानगर पालिका देते का मृत्यूचे आमंत्रण असे जनतेची चर्चा



दै युवक आधार

उल्हासनगर/रशीद शेख धन धन बाबा दीप सिंह गुरुद्वाराच्या आगदी समोरच भला मोठा लोखंडी चेंबरच्या झाकणाची दुर अवस्था झाली आहे येथुन जिव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो एक नवीन नाहीतर झाकन नविन टाका असे चर्चेला उधाण येवु लागलें आहे जर इथे दुर्घटना घडली तर महानगर पालिकेच्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर खापर फोडले जाईल आणि यला फक्त महानगर पालिकाच जबाबदारी राहील

## शाळेचे खेळाचे मैदान ढापले, मैदान हडपून शाळकरी मुलांवर होत आहे अन्याय.

### टाटा पॉवरच्या हाय टेन्शन लाईन खाली नगरपरिषद कसे करत आहे काम ?

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**



खोपोली नगरपरिषद चिमुकल्यांवर अन्याय करत आहे. शिक्षणाच्या अधिकार कायदे अंतर्गत शाळेच्या समोर नैसर्गिक मैदान असणे अनिवार्य असताना सुद्धा खोपोली शहरातील प्रभाग क्रमांक 6 मध्ये येणाऱ्या शाळेच्या समोरील पटांगणात नगरपरिषद मार्फत मोठ्या मुलांसाठी कृत्रिम टर्फ बनवण्यात येत आहे. खेळाचे मैदान हे मुलांसाठी आणि समुदायासाठी एक मौल्यवान ठिकाण आहे, त्याचे संरक्षण करणे व तिथे होणारे अतिक्रमण थांबणे आवश्यक आहे. शाळेच्या समोर लहान मुलांना नैसर्गिक मैदान नसेल तर लहान मुले मातीचा सुगंध कसा घेणार, मुलांना खेळण्यासाठी शाळेसमोर मैदान असायलाच हवे परंतु नगर परिषद प्रशासन फक्त काँक्रीटचे जंगल स्थापन करत आहे. कृत्रिम टर्फ बनवून मोठ्या मुलांना खेळण्यासाठी छोट्या मुलांचे मैदान हडपण्यात येत आहे. हा शाळेच्या मुलांवर अन्याय, अत्याचार आहे. खोपोली नगर परिषदेमार्फत वारंवार मोकळ्या जागेवर अतिक्रमण केले जात आहे. शहरातील पार्क असेल गार्डन असेल शाळेचे मैदान असतील नगरपरिषद प्रशासन काहीही सोडत नाहीये. सगळीकडे कृत्रिम बांधकाम करून काँक्रीटचे जंगल स्थापन करत आहे असे आप खोपोली शहराध्यक्ष ग्यासुद्दीन खान यांनी सांगितले. सदर शाळेच्या मैदानात चाललेले अनैतिक काम त्वरित थांबवावे अन्यथा आम आदमी पार्टी तर्फे नगर परिषदेसमोर आंदोलन करण्यात येईल असे आप प्रदेश संघटन सचिव डॉ पठाण यांनी सांगितले.

## आषाढीसाठी पंढरीच्या वारीत येणाऱ्या ११०९ दिंड्यांना प्रत्येकी २०,०००रुपये.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**



आषाढी वारीमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांसाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. आषाढी वारीनिमित्त मानाच्या १० पालख्यांसोबत येणाऱ्या ११०९ दिंड्यांना प्रति दिंडी २० हजार रुपये अनुदान देण्यास प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. आषाढी एकादशी यात्रेसाठी मानाच्या १० पालख्यांसोबतच्या ११०९ दिंड्यांना प्रती दिंडी रु.२०,००० रुपये याप्रमाणे एकूण २,२१,८०,०००रुपये इतके अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. तसेच वारकऱ्यांसाठी 'चरणसेवा' उपक्रम दरम्यान, पंढरपूरच्या दिशेने निघालेल्या लाखो वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातर्फे 'चरणसेवा' हा उपक्रम राबविण्यात येणारआहे. राज्यातील नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या पाच जिल्ह्यांतून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, उपचार आणि 'चरणसेवा' करण्यासाठी सुमारे पाच हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. या उपक्रमात वैद्यकीय अधिकारी, फिजिओथेरपिस्ट, पॅरामेडिकल कर्मचारी, वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी तसेच स्वयंसेवक यांचा समावेश आहे. वारकऱ्यांच्या दिंडीसाठी एकूण ४३ ठिकाणी मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे.

## कुंदमळा येथील जुना पुल अचानक कोसळला, अनेक पर्यटक इंद्रायणी नदीच्या प्रवाहात वाहुन गेले.

**दैनिक युवक आधार,**
**शिवाजी वाघमारे**
**चिखली,पिंपरी-चिंचवड ,**

मावळ तालुक्यातील कुंदमळा येथील जुना पुल दुपारी ०३:३० वाजता अचानक नदी पात्रात कोसळला आहे कुंदमळा हे मावळ तालुक्यातील प्रसिद्ध प्रयटन स्थळ म्हणून नावलौकिक आहे मागील दोन दिवसांपासून या परिसरात पाऊस पडत होता.पावसाळयात या ठिकाणाला प्रयटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या खूपच जास्त असते.आज रविवार असल्याने या भागात प्रयटक खूप जास्त प्रमाणात आले होते. परिणामी या जुन्या पुलावर अधिक प्रयटक जमा होत होते म्हणून या पुलाच्या क्षमता पेक्षाही जास्त प्रमाणात येणाऱ्या पर्यटकांची संख्या खूपच झाली वजन सहन न झाल्याने हा जुना पुल अचानक नदी पात्रात कोसळला.अनेक प्रयटक इंद्रायणी नदीच्या पाण्याचा प्रवाहात वाहून गेले आहेत, अशी भीती व्यक्त केली जात आहे . स्थानिक नागरिकांची घटनास्थळी मदत कार्य करीत आहेत एन डी आर एफ बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले आहे.२० ते ३० प्रयटक वाहुन गेले आहेत त्या दृष्टीने स्थानिक नागरिकांची मदत मागितली आहे युद्ध पातळीवर मदत कार्य सुरू आहे .



## भारतीय जनता पार्टीच्या परतूर तालुका शहर उपाध्यक्षपदी कुलदीप बिनगे यांची निवड...

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना**
**अशोक ठोके**



भारतीय जनता पार्टीच्या परतुर तालुका शहर उपाध्यक्षपदी कुलदीप बिनगे यांची निवड करण्यात आली. देशाचे लोकप्रिय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या विचाराने प्रेरित होऊन राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे ,कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी प्रदेश सचिव राहुल (भैया) लोणीकर यांच्या सूचनेवरून कुलदीप बिनगे यांची परतुर तालुका शहर उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. भारतीय जनता पक्षाला ताकद मिळवून देण्यासह पक्षाची ध्येयधोरणे , विचार, पक्षाचे काम तळागाळातील सर्वसामान्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याचे काम कराल असे दिलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे. या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनचा वर्षाव होत आहे...

# येत्या जिल्हा परिषद पंचायत समिती महानगर पालिका नगरपालिकेमध्ये भाजपाचा झेंडा फडकवणार आमदार लोणीकरांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**
**मराठवाडा विभागीय संपादक :**
**प्राचार्य जगन्नाथ रासवे**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र जी चव्हाण यांचे विचार तळागाळातील प्रत्येक घराघरापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची असून, सबका साथ सबका विकास सबका विश्वास हे मोदीजींचे ब्रीद ध्यानात घेऊन कार्यकर्त्यांसोबत समरस होत संघटना वाढीसाठी पदाधिकाऱ्यांनी काम करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले ते परतुर येथे भाजपा च्या तालुका कार्यकारणी व विविध आघाड्या प्रकोष्ट च्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीपत्र वाटप समारंभ तसेच नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आ नारायण कुचे यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलत होते

यावेळी व्यासपीठावर, नवनियुक्त जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर, परतूर मंडळाध्यक्ष शत्रुघ्न कणसे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले बद्रिनारायन ढवळे अशोकराव बरकुले महिला आघाडी तालुकाध्यक्ष छायाताई घोरबांड भाजपा शहराध्यक्ष प्रवीण सतोनकर आदींची प्रमुख उपस्थिती होती दरम्यान जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांच्या सत्काराच्या निमित्ताने आमदार बबनराव लोणीकर यांनी आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका महानगरपालिकेचे रणसिंग फुंकले असल्याची चर्चा जोरदारपणे चर्चिली जात होती पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले



की , आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती जालना महानगरपालिका व नगरपालिका निवडणुकीमध्ये आपल्या सगळ्यांना जिद्दीने उतरायचे असून सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सत्ता मिळवायचे असल्याचे यावेळी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांची बोलताना त्यांनी सांगितले पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की पक्ष संघटनेत काम करत असताना तुझा भाऊ न बाळगता कार्यकर्त्यांच्या माध्यमातून थेट तळागाळातील सर्वसामान्य जनतेपर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या योजना पोहोचवण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले पुढे आमदार लोणीकर म्हणाली की, भारतीय जनता पार्टीची एकनिष्ठ राहणाऱ्या कार्यकर्त्याला पक्षाच्या माध्यमातून विविध पदावर काम करण्याची संधी दिली जाते व त्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्याचे काम पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून व्हावे अशी अपेक्षा यावेळी त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांकडून व्यक्त केली पुढे बोलताना ते म्हणाले की केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील फडणवीस सरकार यांच्या माध्यमातून अनेक वैयक्तिक लाभाच्या योजना राबवल्या जात असून या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले परम कर्तव्य असून हे करत असतानाच संघटनेत नवयुवक, युवतींना संघटनेत प्रवाहित करण्याची जबाबदारी ही आपली असल्याचे त्यांनी नमूद केले यावेळी जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे म्हणाले की, पक्ष संघटनेचे काम करत असताना स्वतःला झोकून देत पदाधिकाऱ्यांनी जीवाचे रान करून गावागावा पर्यंत संघटना पोहोचवत येणाऱ्या निवडणुकीमध्ये सर्वच आघाड्यांवर भारतीय जनता पार्टीला यश मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत रहावे, या माध्यमातून वाडी वस्ती झोपडपट्टीवरील कार्यकर्ता भारतीय जनता पार्टीच्या विचाराशी जोडण्यासाठी पोषक वातावरण तयार करून या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याची जबाबदारी पदाधिकाऱ्यांची असल्याचे सांगितले यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की , पदाधिकारी म्हणून आपली जबाबदारी चोखपणे निभावताना ग्रामीण भागामध्ये कार्यकर्त्यांची जाळे निर्माण करतानाच येणारी परतूर नगरपालिकेचे निवडणूक आपण जिंकणारच असा विश्वास व्यक्त केला आपले सर्वांचे नेते आमदार बबनराव लोणीकर सक्षम असून, येणाऱ्या अडचणीवर मात करत आपल्याला प्रत्येकाला संघटनेला बळकटी देण्याचे काम करावयाचे असल्याचे त्यांनी नमूद केले

**वंचित व शिवसेनेमधून अनेक कार्यकर्त्यांचा भाजपामध्ये प्रवेश**

गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये काही लोक रस्ता चुकले होते त्यांनी वंचित बहुजन आघाडी शिवसेने मध्ये काम केले मात्र खरा न्याय भारतीय जनता पक्ष देऊ शकतो आमदार बबनराव लोणीकर घेऊ शकतात हे ध्यानात येताच अनेकांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला यामध्ये रमेश राव थोरात, अर्जुनराव थोरात महादेव वाघमारे सावता काळे गजानन चवडे,( युवा सेना प्रमुख) सावता काळे शहाजी सुरंग नामदेव गोरे दत्ता कोल्हे संपत बंनगावडे सय्यद असलम राजू शेख शेषराव अवचार शिवाजीराव आवचार कैलास आवचार वैजनाथ नागरे सुभाष नागरे गजानन मुळे अनिल अवचार इंद्र अवचार विलास अवचार काळूराम मस्के योगेश सुरोशे सुनील आवचार रवी अवचार कुणाला विचार ओंकार आवचार अर्जुन सुरोशे भाऊसाहेब नागरे रामजी सोळंके, विश्वंभर काळे अर्जुन काळे शुभम काळे नितीन काळे सिद्धेश्वर काळे प्रल्हाद चवडे , कारभारी घुले श्याम सुराशे राजेश माळवे गोविंद मोहिते योगेश घुले रघुनाथ काळे ब्रह्मदेव घुले हरी ओम चवडे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला

यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष आमदार नारायण कुचे यांचा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर भारतीय जनता पार्टी कार्यकारणी, भाजप कार्यकारणी, ओबीसी मोर्चा कार्यकारणी, यासह सर्व प्रकोष्ट सेलच्या नूतन पदाधिकाऱ्यांना आमदार बबनराव लोणीकर आमदार नारायण कुचे भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आली या कार्यक्रमाला भगवानराव मोरे दया काटे पंचायत समिती सदस्य दिगंबर मुजमुले शिवाजी पाईकराव प्रदीप ढवळे तुकाराम सोळंके भाजपा माणिकराव वाघमारे, प्राचार्य जगन्नाथ रासवे,परमेश्वरा आकात बंडू मानवतकर गजानन लोणीकर,बंडू मानवतकर सिद्धेश्वर केकान, मधुकर मोरे , अमोल पवार, ज्ञानेश्वर सोळंके, गजानन लिपणे संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, दिनेश होलानी, ओम प्रकाश मोर, अमोल अग्रवाल, अमर बगडिया, नरेश कांबळे, सुरेश काळे, भगवान आरडे, मधुकर मोरे, बाबाराव थोरात बबलू सातपुते आसिफ कच्ची नसरुल्ला काकड श्री गांजाळे सुरेश जगताप, विजय यादव गोपी ठाकूर सनी तनपुरे, मेरा खतीब विश्वंभर शेळके हनुमान चिखले अशोक भांडवले कैलास यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते नागरिकांची उपस्थिती होती

## केएलई कॉलेजजवळ कचरा टाकणाऱ्या नागरिकावर महापालिकेची कारवाई
### स्वच्छतेचे उल्लंघन गंभीरपणे घेतले; पोलिसांत तक्रार व दंडात्मक कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**



पनवेल महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षकांनी केएलई कॉलेज परिसरात सातत्याने कचरा टाकणाऱ्या कळंबोलीतील रहिवासी श्री. लक्ष्मीनारायण यादव यांच्यावर कडक कारवाई केली आहे. पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचनांकडे दुर्लक्ष करून यादव यांनी कचरा टाकणे सुरूच ठेवले होते.अखेर त्यांच्यावर नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने कळंबोली पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली असून, नियमानुसार श्री.यादव यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ भारत अभियान महापालिका कार्यक्षेत्रात राबविले जात आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या उद्दिष्टांनुसार शहरात स्वच्छता राखण्यासाठी पालिकेचे सफाई कर्मचारी सातत्याने सफाई करत असतात. या पार्श्वभूमीवर ही कारवाई अत्यंत महत्त्वाची आहे. शहरात सार्वजनिक स्वच्छता राखण्याच्या दृष्टीने नागरिकांनी महापालिकेच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारचा कचरा सार्वजनिक ठिकाणी न टाकता तो योग्य पद्धतीने कचरा कुंडीत टाकावा, असे आवाहन उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांनी महापालिकेच्यावतीने केले आहे.

## ऍड. अजित रोकडे बीएलएस एलएलबी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाल्याबद्दल अभिनंदन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



: पनवेल येथील ऍड.अजीत दशरथ रोकडे (मूळचे सातारा जिल्ह्यातील जावळी तालुक्यातील सोनगावचे रहिवासी) हे विधी अभ्यासक्रम (बीएलएस एलएलबी) यशस्वीरीत्या पूर्ण करून उत्तीर्ण झाले आहेत. याबद्दल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन आणि पुढील वकील क्षेत्रात उत्तम कार्य करण्याकरीता शुभेच्छा दिल्या जात आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी तसेच त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात सक्षमपणे खंबीर नेतृत्व करण्यासाठी, बेरोजगारांसाठी रोजगार, शेतकरयांना योग्य हमीभाव, कष्टकरी कामगारांना योग्य सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कायम प्रयत्नशील राहणार असून संविधानाची निर्मिती करणारे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन कायम सदैव लोकसेवा करण्याकरीता उपलब्ध असेल असे आश्वासन देत अजीत रोकडे यांनी उत्तीर्ण झाल्या बद्दल मत व्यक्त केले आहे. विधी अभ्यासक्रम (बीएलएस एलएलबी) यशस्वीरीत्या पूर्ण करून उत्तीर्ण झाल्या बद्दल विविध स्तरातून अजित रोकडे यांचे अभिनंदन होत आहे.

## सोन्याची चैन प्रामाणिकपणे परत केली : प्रभाग 18 मधील स्वच्छता कर्मचाऱ्याचे सर्वत्र कौतुक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



: वडाळे तलाव परिसरात सकाळी जॉगिंगसाठी येणाऱ्या एका नागरिकाची सोन्याची चैन हरवल्याची घटना घडली. मात्र प्रभाग क्रमांक 18 मधील स्वच्छता कर्मचारी श्री. विश्वनाथ पाटील यांनी आपली प्रामाणिकता दाखवत ती चैन संबंधित व्यक्तीपर्यंत परत पोहोचवली. वडाळे तलाव परिसरात सकाळी स्वच्छतेचे काम करत असताना स्वच्छता कर्मचारी श्री. विश्वनाथ पाटील यांना सोन्याची चैन सापडली. त्यांनी तत्काळ ती वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली शहानिशा करून हरवलेली वस्तू संबंधित नागरिकाला परत केली. या प्रामाणिक व जबाबदार कृत्याबद्दल श्री. पाटील यांचे महापालिका प्रशासनाच्यावतीने कौतुक करण्यात येत आहे. त्यांच्या या वर्तनामुळे इतर कर्मचाऱ्यांनाही प्रोत्साहन मिळाले असून, समाजात सकारात्मक संदेश गेला आहे.

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त मालेगाव बाजार समिती परिसरात
### आमदार अमित झनक यांच्या हस्ते वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी वाशिम.**
**करण धोंगडे.**

मालेगाव :- आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने "एक वृक्ष आईच्या नावाने" या भावनिक आणि प्रेरणादायी उपक्रमांतर्गत शुक्रवारी स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमात आमदार अमित झनक यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी बाजार समितीचे सभापती अड. संतोष पोफळे, उपसभापती संदीप घुगे, संचालक रवि भुतडा, उद्धव गोडे, उल्हासराव घुगे, भूषण खाडे, दादाराव आदमने, राजू गिद, सुरेश शिंदे, डॉ. निलेश मानधने तसेच व्यापारी महेश जाजू , मुरलीधर परताणी, दशरथ वानखेडे, किशोर काबरा, विजय अडिचवाल, कृष्णा अहिर, विठ्ठल बोरचाटे यांसह इतर व कर्मचारी उपस्थित होते. या वृक्षारोपण उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच सहकार तत्वांनुसार सामाजिक बांधिलकी जपणे हा होता. उपस्थितांनी आपल्या मातांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करून उपक्रमाला एक भावनिक अधिष्ठान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी वक्त्यांनी सहकार भावना बळकट करण्याबरोबरच पर्यावरण रक्षणासाठी लोकसहभाग वाढविण्याचे आवाहन केले.



# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डोंगरगावला 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेत १ लाखाचे बक्षीस!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

डोंगरगाव, ता. निफाड, जि. नाशिकः निफाड तालुक्यातील डोंगरगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' अभियान टप्पा क्रमांक दोनमध्ये नेत्रदीपक यश संपादन केले आहे. तालुक्यातून तिसरा क्रमांक पटकावत शाळेने १ लाख रुपयांचे गौरवशाली बक्षीस पटकावले आहे, ही बातमी समस्त विद्यार्थी शिक्षक अधिकारी व ग्रामस्थांसाठी अभिमानास्पद ठरली आहे. शाळेने या स्पर्धेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे केवळ बक्षीस नव्हे, तर 'आदर्श शाळा' म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. या यशात शाळेने राबविलेले विविध उपक्रम आणि



नवनवीन शैक्षणिक पद्धतींचा मोलाचा वाटा आहे. गेल्या दोन वर्षापासून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हे अभियान पूर्ण राज्यभरात राबवण्यात येत आहे शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी वर्षभर राबवलेल्या उपक्रम सहशालेय उपक्रम गुणवत्तापूर्ण अध्यापन या सर्व बाबींमुळे शाळेला यावर्षी सदर बक्षीस मिळाले आहे शाळेची ठळक वैशिष्ट्ये आणि उपक्रमः

आनंददायी शिक्षणः विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी विविध अभिनव पद्धतींचा वापर केला जातो.

YOUTUBE चॅनेल आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिडिओ आणि ऑडिओच्या माध्यमातून शिक्षण दिले जाते.

स्वतंत्र प्रयोगशाळा आणि संगणक कक्षः विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी सुसज्ज प्रयोगशाळा उपलब्ध आहे, तसेच संगणक कक्षामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल साक्षरता मिळते.

सहशालेय उपक्रमः शैक्षणिक सहली, विद्यार्थी नेतृत्वगुण संधी, अनुभवी प्रशिक्षित शिक्षकवृंद आणि स्पर्धा परीक्षा तयारी यांसारख्या उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला जातो.

राज्यस्तरीय .ए.आय. लॅबची उभारणीः राज्यातून निवडक शाळांमध्ये उभारण्यात आलेल्या ए.आय. (ARTIFICIAL INTELLIGENCE) लॅब चा लवकरच समावेश आहे, यामुळे विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळेल .

विद्यार्थी कलागुण निर्मितीः विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी २० लाख रुपयांच्या निधीतून 'नूतन हॉल'ची निर्मिती लवकरच होणार आहे.

RO WATER SYSTEM: विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

विशेष उपक्रमः
शाळेने शैक्षणिक आणि सामाजिक जाणीव वाढवण्यासाठी अनेक उपक्रम यशस्वीपणे राबवले आहेत, ज्यात 'स्वातंत्र्यदिन शोभायात्रा', 'वेशभूषा स्पर्धा', 'अधिकारी मुलाखत', 'वृक्षारोपण', 'एक मूल, एक झाड', 'मी अधिकारी होणार', 'पुस्तकावर बोलू काही', 'माझी बोली,इंग्रजीमधून संभाषण ', ' सांकेतिक भाषेतून नाविन्यपूर्ण शिक्षण ', 'कल्पना विकास', 'विद्यार्थी भांडारगृह', 'स्कालरशिप मार्गदर्शन', 'नवोदय मार्गदर्शन', 'विज्ञान जत्रा', 'बाल आनंद मेळावा', 'विज्ञान प्रश्नोत्तरी', 'स्पेलिंग बी स्पर्धा', 'मैथ्स बी स्पर्धा', 'मंथन स्पर्धा परीक्षा', 'बाजार', 'विद्यार्थी बचत बँक' आणि 'माझी गोष्ट' यांसारख्या वैविध्यपूर्ण उपक्रमांचा समावेश आहे.

या सर्व उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानवृद्धीबरोबरच आत्मविश्वास आणि नेतृत्वगुणांचा विकास होत आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डोंगरगावने मिळवलेले हे यश इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरले आहे. शाळेचे मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांचे या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.

प्रवेश सुरूः
इयत्ता 1 ली ते 7वी साठी शाळेत प्रवेश सुरू झाले असून, आजच आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लायन्स सरगमच्या अध्यक्षपदी प्रेमेंद्र जयवंत बहिरा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम ने गेल्या वर्षात अतिशय चांगले उपक्रम आयोजित करुन डिस्ट्रिक्ट मध्ये खूप अवॉर्ड मिळवले आहेत ही मोठी गोष्ट असून येणाऱ्या नवीन वर्षात सुद्धा सरगम क्लब प्रेमेंद्र बहिरा यांच्या अध्यक्षतेमध्ये अजून जोमाने कार्य करेल असा विश्वास माजी प्रांतपाल आणि मल्टिपल कौन्सिल चेअरमन राकेश चौमल यांनी व्यक्त केला ते लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम चा पदग्रहण समारंभ आणि दुसरी चार्टर नाइट सोहळ्याच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. हा सोहळा नुकताच गोखले सभागृह येथे मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. यावेळी राकेश चौमल यांनी सन 2025-26 या लायन वर्षासाठी प्रेमेंद्र बहिरा यांना अध्यक्षपदाची शपथ दिली. त्यांच्याबरोबर सचिव म्हणून आदित्य दोशी तर खजिनदार म्हणून धवल शहा यांनी सुद्धा आपल्या पदाची शपथ घेतली.

या वेळी जयेश मणियार आणि संध्या महानुभाव यांना उपाध्यक्ष तर संजय गोडसे, स्वाती गोडसे, संविदा पाटकर, सुनील देशपांडे, मिलिंद जोशी, ओंकार खेडकर, अनिल परमार, सुषमा पन्हाळे आणि महेंद्र लोहार यांनी सुद्धा विविध पदांचा पदभार स्वीकारला.



नवनिर्वाचित अध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की त्यांच्या वडिलांच्या स्मरणार्थ खांदा कॉलनी येथील शाळेमध्ये वाचनालय सूरु करण्याचा त्यांचा मानस आहे त्याचबरोबर आंतर महाविद्यालयीन कोळी नृत्य स्पर्धा, अन्न दान, चेक डॅम सारखे उपक्रम सुद्धा क्लबतर्फे घेण्यात आहेत.

मावळत्या अध्यक्ष मानदा पंडित यांनी गतवर्षी सर्व सभासदांकडून मिळालेल्या सहकार्यामुळेच गतवर्षी क्लबने चांगले काम केल्याचे सांगितले आणि सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमात चिपळे शाळेतील विद्यार्थ्यांना दफ्तर वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती गोडसे यांनी केले तर आभार आदित्य दोशी यांनी मानले याप्रसंगी माजी प्रांतपाल मुकेश तनेजा, मोहिनी तनेजा, धरमपाल चूघ, तुकाराम घोडके, मिलिंद पाटील, अनुप थरवाणी, मीना थारवानी, सुयोग पेंडसे, आलोक मिश्रा, नमिता मिश्रा, सत्यपाल चूघ, रमाकांत म्हात्रे, मदन गोवारी, राजेंद्र महानुभाव, धनंजय पाटील, सुरभी पेंडसे, अशोक गिल्डा, अश्विनी खेडकर, सरिता सादराणी आदि मान्यवर उपस्थित होते.

## घाटंजी न.प.निवडणुकीत किंगमेकर सतिशभाऊ मलकापूरे यांची भुमिका ठरवणार येणारा नगराध्यक्ष कोण? होणार.

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

घाटंजी न.प.निवडणूक काही दिवसावर आल्याने राजकीय हालचालीना वेग आलेला शहरात दिसत आहे गल्ली बोळात,चाय कैंटिंग,पाणपटरीवर सध्या कोण होणार नगराध्यक्ष यावर चर्चा सूरु आहे पण घाटंजी शहराच्या राजकारणात मागिल तिन दशकापासून सतिश मलकापूरे यांची भुमिका महत्त्वाची ठरत आहे सध्या ते राजकारणात पूर्वीसारखे सक्रिय जरी नसले तरी नूकत्याच झालेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत भाजपाला समर्थन देत प्रचार यंत्रनेत सहभागी झाले याचेच फलित दोनही निवडणुकात भाजपाला शहरात आघाडी मिळाली परंतू स्थानिक निवडणुका पक्षापेक्षा स्थानिक मुद्यावर तसेच व्यक्तीवर लढल्या जाते यामूळे सतिश मलकापूरे काय भुमिका घेणार यावरच शहराचा नगराध्यक्ष कोण होणार हे ठरणार आहे. सतिश मलकापूरे म्हणजे दिलेला शब्द पाळणारा माणूस म्हणून शहरात प्रचलीत आहे त्यांचे राजकीय कारकिर्दी बद्दल बोलायचे झाल्यास पूर्वी मा.मंत्री शिवाजीराव मोघे यांचे सोबत कॉग्रेस मध्ये सक्रिय होते जवळपास शहर कॉग्रेसचे सर्व निर्णय तेच घ्यायचे तेव्हा शहरात कॉग्रेस ला सुगीचे दिवस होते याचदरम्यान राज्यात प्रथमच थेट नगराध्यक्ष निवडणूक पद्धत आली तेव्हा कॉग्रेस चे थेट नगराध्यक्ष उमेदवार सतिश मलकापूरे होते ऐनवेळी लोणकर गटाने भुमिका बदलल्याने फक्त १५० मतांनी पराभूत झाले परंतू संपूर्ण शहराने त्यांची ताकद बघितली नंतर त्यांनी कॉग्रेस ला रामराम करत भाजपा मध्ये प्रवेश करत २००६ ला ते भाजपा तालुका अध्यक्ष असतांना कॉग्रेसला मात देण्याकरिता पालिका निवडणूकित निवडणुक पुर्व राष्ट्रवादीशी युती करत ११ राष्ट्रवादी व ६ भाजपा सिट लढत ६ पैकी ६ भाजपा नगरसेवक निवडून आणले तसेच ते स्वतःही एकतर्फी निवडणूक जिंकले तेव्हा पहिल्यांदा शहरात भाजपाचा पालिकेवर झेंडा रोवला व अडिच वर्षे भाजपाचा नगराध्यक्ष बसविला तेव्हापासून भाजपाच्या नशिबी नगराध्यपद आल नाही अद्याप तरी सतिश मलकापूरे यांनी पालिका निवडक संदर्भात आपली भुमिका स्पष्ट केलेली नाही ते स्वतः सावध भुमिका घेत आहे.



सतिश मलकापूरे यांचेकडे आजही शहरातील अणेक लोक आपआपली समस्या घेऊन येतात सर्वांच्या समस्यांचे बसल्याजागी फोनवर निराकरण करतात त्यांची सर्व समाजाच्या लोकांशी मधूर संबंध आहे मागिल दोन वर्षापासून शहरात GPL चे यशस्वीपूर्ण आयोजन करत शहरातील युवकावरही सतिश मलकापूरे या नावानी भुरळ घातली आहे स्पष्ट बोलणारे म्हणून त्यांची ख्याती आहे घाटी-घाटंजी दोनही भागात खर्या अर्थाने एकगठ्ठा मतदान शहरात कोणाजवळ असेल तर ते नाव सतिश मलकापूरे आता येणारा नगराध्यक्ष कोण होणार हे सूद्धा सतिश मलकापूरे यांच्या भुमिकेवरच अवलंबून राहणार आहे अशी चर्चा सध्या संपूर्ण शहरात सूरु आहे

## प्रत्येक दिव्यांगांसाठी मधु तारा प्रत्येकांसाठी

**प्रत्येक दिव्यांगांसाठी मधु तारा प्रत्येकांसाठी**
**प्रत्येक दिव्यांगांसाठी मधु तारा प्रत्येकांसाठी**
**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

शेतकऱ्यांची कर्ज माफी व्हावी.दिव्यांगाना 6000 रू पेन्शन मानधन वाढ व्हावी यासाठी अमरावती येथे मोझरी या गावी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाधी स्थानी मा.आमदार दिव्यांगांचे दैवत प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष मा.ओमप्रकाश उर्फ बच्चू भाऊ कडू यांनी दिनांक 8 जून पासून सुरू केलेल्या अन्नत्याग आंदोलनाला राज्यभर दिव्यांगांसाठी कार्य करणाऱ्या मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष श्री नितीनजी शिंदे यांनी बच्चू भाऊ कडू यांची भेट घेऊन चर्चा केली आणि आंदोलनाला पाठिंब्याचे पत्र बच्चू भाऊ यांना दिले.



दोन महिन्यापूर्वी रायगड वर सुद्धा ज्या वेळेस दिव्यांगांच्या शेतकऱ्यांच्या मागण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने आंदोलन ठेवण्यात आले त्याही वेळेस मधु ताराने मा.बच्चू भाऊ यांना पत्र देऊन पाठिंबा दिला होता.

या प्रसंगी 86 टक्के दिव्यांग असलेल्या वर्धाच्या मधु ताराच्या संस्थापक विश्वस्त अश्विनी गिरडकर मॅडम. मधु तारा वर्धा शहराध्यक्षा वैशाली गिरडकर मॅडम तसेच वर्धा येथील प्रहार अध्यक्ष प्रमोद भाऊ कुऱ्हाडकर आणि त्यांचे पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

या वेळी मधु तारा प्रमुख श्री नितीनजी शिंदे यांनी मधु तारा दिव्यांगांच्या न्याय हक्कासाठी सदैव सर्वांसोबत राहून कार्य करते.अनेक दिव्यांग संघटनेच्या आंदोलनाला पाठिंबा देते.

आज बच्चू भाऊ यांनी स्वतःच्या तसेच परिवाराच्या आयुष्याचा विचार न करता दिव्यांगांच्या आणि शेतकऱ्यांना उज्वल भविष्य लाभावे त्यांना सन्मानाने जगता यावे या साठीच्या अन्नत्याग आंदोलनाला नेहमी मधु तारा कायम पाठीशी खंबीर पणे सोबत असेल असे आश्वासन मा.बच्चू भाऊ यांना दिले.

# राष्ट्रवादी (श.प.) सोलापूर जिल्हा अध्यक्ष पदाचे निवड पत्र माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते वसंत (नाना) देशमुख यांना देऊन केला सन्मान"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्षपदावर पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवारसाहेब, ज्येष्ठ नेते माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील ,आणि माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार उत्तमराव जानकर यांच्या खास मर्जीतील व पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष, पंढरपूर पंचायत समिती व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती वसंत (नाना )देशमुख यांची निवड झाल्याचे पत्र शिवरत्न बंगल्यावरती सर्व मान्यवरांच्या समवेत महाराष्ट्र



राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांच्या पुढील वाटचालीस दादासाहेबांनी शुभेच्छा देऊन पक्ष संघटनेच्या कार्यात वाहून घेऊन नवा विक्रम घडवण्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी माढा लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार धैर्यशील भैया मोहिते पाटील यांनी येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका नगरपरिषद व ग्रामपंचायत निवडणुकीच्या संदर्भात आपण गाफील न राहता मोठ्या जिद्दीने आपल्या पक्षाची ध्येयधोरणे गाव पातळीपर्यंत पोहोचवण्याचं काम आपण सर्वांनी केल पाहिजे आणि हे काम आपण माननीय पवार साहेब व आदरणीय मोठे दादासाहेब आणि आपल्या पक्षातील सर्व ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली निश्चितपणाने करणार आहोत याची निश्चितपणाने मला खात्री आहे अशा प्रकारे मत व्यक्त करून पक्षाचा लेखाजोखा उपस्थितांसमोर मांडला. तर सत्कारमूर्ती व नूतन जिल्हाध्यक्ष वसंत (नाना) देशमुख यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की मी आदरणीय दादासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती जिल्हा परिषद व सहकार क्षेत्रामध्ये त्यांचा एक प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून काम केलेले आहे. आणि आता माझ्यावरती जिल्ह्याची जबाबदारी दिलेली आहे ती सुद्धा मी आपल्या सर्वांच्या सहकार्याने निश्चितपणे व प्रामाणिकपणाने पार पाडण्याचा प्रयत्न करून आपल्या पक्षाला जिल्ह्यामध्ये निश्चितपणे यश प्राप्त करून दिल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारची ग्वाही दिली. सदर प्रसंगी सांगोल्याचे जेष्ठ नेते बाबुराव गायकवाड, जिल्हा कार्याध्यक्ष रवी पाटील ,पंढरपूर शहराध्यक्ष सुभाष भोसले, विश्वासराव बारबोले, जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष अरुण ( भाऊ) तोडकर, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट वजीर शेख, माळशिरस तालुकाध्यक्ष माणिक (बापू) वाघमोडे, जिल्हा महिला आघाडी प्रमुख सुवर्णा शिवपुरे, युती आघाडीच्या विनंती कुलकर्णी, राहुलशेठ शहा तसेच जिल्ह्यातील मोहिते पाटील समर्थक व राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# इसम बेपत्ता



**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**
नेरे, महालक्ष्मी नगर येथील उमेश लक्ष्मण कटके (42) हा घरातून कोणाला काही न सांगता निघून गेल्याने तो हरवला असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली.
तो अंगाने मध्यम असून त्याचा चेहरा गोरा आणि उभट आहे. त्याच्या डाव्या डोळ्याच्या बाजूस दोन तीळ असून अंगात ग्रे कलरचा टी शर्ट आणि काळ्या रंगाचा बर्मुडा परिधान केला आहे. त्याला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा येते. या इसमाबद्दल अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक प्रदीप पोपेटे यांच्याशी संपर्क साधावा.

# जागृती फाऊंडेशन आणि वडाळे तलाव संगीत ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/ प्रतिनिधी**
जागृती फाऊंडेशन आणि वडाळे तलाव संगीत ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने नंदनवन कॉप्लेक्स च्या समोरील जागेत वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला यावेळी जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी जागृती फाऊंडेशन विविध क्षेत्रात करीत असलेल्या सामाजिक कामाची माहिती सांगितली .या वृक्षारोपण कार्यक्रमास गो ग्रीन नर्सरी यांचे देखील सहकार्य लाभले जागृती फाऊंडेशन दर वर्षी पावसाळा सुरु झाला का पनवेल ग्रामीण भागासह शहरी भागात




वृक्षरोपण कार्यक्रमाचे आयोजन करते या वर्षी देखील हा उपक्रम सुरु करीत असताना वडाळे तलाव संगीत ग्रुप यांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे सांगितले त्यानुसार आज पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील नंदन वन कॉप्लेक्स च्या समोरील आवारात वृक्षरोपण कार्यक्रम मोठया उत्साहात संपन्न झाला. यावेळी सुहासिनी केकाणे आणि संतोष जितेकर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले जागृती फाऊंडेशन करीत असलेल्या सामाजिक कामात आम्ही नेहमी जागृती फाऊंडेशन च्या सोबत असू अशी देखील ग्वाही त्यांनी यावेळी दिली . या कार्यक्रमास जागृती फाऊंडेशन चे महाराष्ट्र प्रदेश युथ सेक्रेटरी अरिन सोनावणे , पनवेल तालुका युवा अध्यक्ष जश राठी, युवा सेक्रेटरी समीर शेलार ,तळोजा विभागीय अध्यक्ष कल्पेश कांबळे ,उपाध्यक्ष संदेश पाटील ,सोमटणे विभागीय अध्यक्ष मयूर गायकवाड ,वडाळे तलाव संगीत ग्रुप चे संतोष जितेकर ,चंद्रकांत मंजुळे. सुहासिनी केकाने माजी नगरसेविका नीता माळी, सरोज जितेकर,ज्योती गुनगे,प्रमोद म्हात्रे, राज नाईक ,डॉक्टर कांचन मालवी. नयना मगदूम. रामदास मगदूम. निता मंजुळे,अरुण धंदर , भारती एकलरे,चारुलता सोनवणे,पल्लवी पाटील .,नंदा धंदर ,रमेश बीद. अतिश वालेलकर,मिथुन रामधरणे, नयना मलाविया, राजेश मालावीया , जावेद भाई, अश्विनी गावडे, मिस चैतन्य पत्रकार शंकर वायदंडे ,अण्णासाहेब आहेर आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी वडाळे तलाव संगीत ग्रुप, गो ग्रीन नर्सरी जागृती फाऊंडेशन सह उपस्तिथ मान्यवरांचे आभार मानले .

## "वाचू आनंदाने" उपक्रमात वाचनप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग; पितृदिनानिमित्त प्रकाश देशपांडे यांचा सन्मान

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी)** – चिपळूण नगर परिषद, लोकमान्य टिळक वाचनालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने "वाचू आनंदाने" या वाचनप्रवृत्ती वाढविणाऱ्या उपक्रमाचे आयोजन रविवारी चिपळूणमध्ये उत्साहात पार पडले. या उपक्रमाला चिपळूणकर नागरिकांचा दर रविवारी चांगला प्रतिसाद मिळत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सध्या हा उपक्रम वाचनालयाच्या आवारातच राबविण्यात येत असल्याची माहिती प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर यांनी दिली. कार्यक्रमात पितृ दिनाचे औचित्य साधून चिपळूणच्या साहित्य, सांस्कृतिक, कला आणि क्रीडा क्षेत्रातील ज्येष्ठ मार्गदर्शक व्यक्तिमत्त्व म्हणून प्रकाश देशपांडे यांचा "मोगऱ्याचे फूल" देऊन सन्मान करण्यात आला. विविध क्षेत्रात वडीलधाऱ्या भूमिकेत असलेल्या व्यक्तींना मान देण्याचा उपक्रमाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला. या वेळी अक्टीव्ह ग्रुपचे कैसर देसाई, नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी मंगेश पेढांबकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालयाचे प्रतिनिधी सुनिल खेडेकर, वाचनालय व नगर परिषदेचे कर्मचारी तसेच शहरातील वाचनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. चिपळूणमध्ये वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्याच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, पुढील रविवारीही नव्या उपक्रमासह "वाचू आनंदाने" कार्यक्रम होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.






दैनिक युवक आधार, पाटोदा :
– २५ मे रोजी पाटोदा शहरात ब्राह्मण समाज बांधवांच्या वतीने न्यायाधीश पदी निवड झालेल्या ऋचा कुलकर्णी तसेच स्टेट बँक ऑफ इंडियाच्या व्यवस्थापकपदी थेट निवड झालेल्या मृणाली आणि रेवती प्रशांत देशमुख यांचा गौरव सोहळा आष्टी /पाटोदा /शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या उपस्थितीत पार पडला होता, या मधील रेवती प्रशांत देशमुख यांचे सन्मानपत्र काही तांत्रिक कारणामुळे त्या दिवशी उपलब्ध झाले नव्हते शनिवार रोजी बीड या ठिकाणी देशमुख यांच्या निवासस्थानी दैनिक दिव्य मराठीचे उपसंपादक अमोल मुळे यांच्या हस्ते त्यांना सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. या प्रसंगी पत्रकार अँड.महेश बेदरे, श्रीकांत धसे, प्रशांत देशमुख यांच्या सह कौटुंबिक सदस्य उपस्थित होते.

# तनाळी येथे विहीरीत पडलेल्या बिबट्याला जीवदान

## वन विभागाच्या बचाव पथकाने सुखरूप बाहेर काढून नैसर्गिक आधिवासात सोडले

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी):-** तालुक्यातील तनाळी राधाकृष्णवाडी येथील सहदेव धोंडू बाईत यांचे घरामागच्या विहीरीत बिबट्या पडला असल्याचे रविवारी सकाळी समोर आले. त्यानंतर याबाबतची माहिती येथील ग्रामस्थांनी वन विभागाला देताच वन विभागाच्या बचाव पथकाने घटनास्थळी गाव घेत या बिबट्याला विहिरीतून सुरक्षितरित्या बाहेर काढून नैसर्गिक अधिवासात सोडले आहे. तनाळी राधाकृष्णवाडी येथील सहदेव बाईत यांच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या विहिरीत बिबट्या पडल्या असल्याचे सौ. सनवी सुरज बाईत यांच्या सकाळी ९.०० वाजता निदर्शनास आला. यानंतर याची माहिती पोलिस पाटील राजेश थरवळ यांना देण्यात आली. त्यांनी ही माहिती वन विभागाला दिली. यानंतर वन परिमंडळ अधिकारी चिपळूण एस.एस. सावंत, वन परिमंडळ अधिकारी फिरते पथक रत्नागिरी चिपळूण चे जी.एम. पाटील, वनरक्षक फिरते पथक दत्ताराम सुर्वे, वनरक्षक रामपूर राहूल गुंठे, वनरक्षक अनंत मंत्रे, व वाहनचालक नंदकुमार कदम, संजय अंबोकर यांनी वन विभागाचे बचाव पथक सामग्री व अधुनिक पिंजऱ्यासह घटनास्थळी धाव घेतली.



विहीरीमध्ये पडलेल्या बिबट्यास काही वेळातच सुखरूप बाहेर काढले. विहरीमधून बाहेर काडल्यानंतर बिबट्याचे पशुवैद्यकीय अधिकारी श्री. कणसे यांनी पाहणी करून तो सुस्थितीत असल्याचे खात्री केली. सदर बिबट्या हा मादी जातीचा असून त्याचे अंदाजे वय दोन ते अडीच वर्षे असल्याचे सांगितले. सदर बिबट सुस्थितीत असल्याने त्याला नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्याबाबत अहवाल दिला. त्यासअनुसरून वन विभागाचे बचाव पथकाने सदर बिबट्यास सहाय्यक वनसंरक्षक श्रीमती प्रियंका लगड यांचे समक्ष नैसर्गिक अधिवासात मुक्त केले. या बचाव पथकास श्रीमती विभागीय वनअधिकारी गिरिजा देसाई, व सहाय्यक वनसंरक्षक प्रियंका लगड, व वनपरिक्षेत्र अधिकारी एस.एस. खान चिपळूण यांचे मार्गदर्शन लाभले. मानवी वस्तीत बिबट आलेस किंवा संकटात सापडलेस त्याबाबतची माहिती वनविभागास कळविणेबाबत वनविभागामार्फत अहवान करणेत येत आहे. याबाबत अधिक माहितीसाठी वनपरिक्षेत्र अधिकारी चिपळूण एस. एस. खान यांनी वन विभागाचा टोल फ्री क्रमांक १९२६ वर संपर्क साधवा असे आवाहन केले आहे.

## राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान* *मनसे आर्णी तालुक्याच्या वतीने उपक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**आर्णी : देवा पवार**
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्षाध्यक्ष राज यांचा 14 जून रोजी वाढदिवस होता,
त्या अनुषंगाने मनसे पदाधिकाऱ्यांकडून आर्णी तालुक्यातील स्व. मातोश्री सुशीलाबाई नागपुरे वृद्धाश्रम येथे अन्नदान करण्यात आले, सामाजिक कार्य बघता तालुक्यातील मनसे प्रथम क्रमांकावर येते, जनसामान्यांसाठी लढा, आंदोलने अशी अनेक प्रकारची सामाजिक कार्ये पक्षाच्या वतीने झालेली आहेत.
राजसाहेब ठाकरे यांच्या मते 80% समाजकारण व 20% राजकारण याच संकल्पनेवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना काम करत असते.
तोच ब्रीदवाक्य ध्यानी ठेउन आम्ही काम करीत असतो असे तालुकाध्यक्ष सचिन यलगंधेवार म्हणाले.
त्यावेळी शहराध्यक्ष कपिल ठाकरे,संदिप गाडगे,अजय पिकलमूडे,विकास ठमके,धिरज कोडापे,दिपक बोरकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.




# स्टार फिल्मी कलाकारांच्या हस्ते समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण.


## बी. एस. एफ.बहुद्देशीय संस्थेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी – किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**
बी. एस. एफ. बहुद्देशीय संस्थेच्या वतीने समाज क्रांती राज्य स्तरीय पुरस्कारासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकांचे प्रस्ताव स्वीकारणे सुरु आहे. आता पर्यंत अभिनेत्री श्रावणी शिरोळकर, अंजली अहिरे, राजनंदिनी अहिरे,मनिष मुथा, ऍड. भारत गोरवे,अमित अशोक चौहान,सुरेखा गांगुर्डे,पत्रकार रमेश गोसावी,दत्तात्रय आठरे पाटील,अनिल उमाजी मस्के,









डॉ संदीप विनायक काकड, पत्रकार सारंग महाजन, अभिनेत्री केतकी गावडे, अभिनेता सुरज जाधव,पत्रकार डॉ.शाम जाधव, पत्रकार रामभाऊ आवारे,पत्रकार रामचंद्र ताठे,प्रवीण जाधव,देविदास साळवे, कीर्तनकर सविता पारखे, प्रतिभा कांबळे, रावसाहेब घोडेराव, मॉडेल योगिता दांडगे, अभिनेत्री मनाली कांबळे यांना समाज क्रांती पुरस्कार २०२५ जाहीर झाला आहे. कला क्षेत्रातील त्यांच्या या कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार बी. एस. एफ. बहुद्देशीय संस्थेच्या वतीने जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार सोहळा अमरावती जिल्ह्यात ऑगस्ट महिन्यात होणार असून चित्रपट क्षेत्रातील दिग्गज कलाकारांच्या हस्ते देण्यात येणार आहे. बी. एस. एफ. बहुद्देशीय संस्थेच्या वतीने समाज क्रांती पुरस्कार सोहळा हा पहिल्यांदा चा आयोजित करण्यात येत आहे. कला, पत्रकारिता, समाजसेवा, साहित्य, कृषी व अश्या विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करण्याऱ्या लोकांना हा समाज क्रांती राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे अशी माहिती संस्थेच्या शीतल गजभिये यांनी दिली. पुरस्कार निवडीची प्रक्रिया सुरु आहे अधिक माहिती साठी 9420621994 या व्हाटसप वर संपर्क करावा अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष भूषण सरदार यांनी दिली. आयोजक समिती मधील भूषण सरदार, गोरखनाथ वाघमारे, शैलेश मेश्राम, रॉयल सरदार, आदित्य वानखडे, ललिता वानखडे, राहुल शिंगोले, सौरव शेलारे, अरुण महाजन, सुरेखा गांगुर्डे,डॉ.शाम जाधव,सामाजिक कार्यकर्त्या राजनंदिनी अहिरे, डॉ. संदीप काकड, अंजली अहिरे, रामभाऊ आवारे,पत्रकार सारंग महाजन, यांनी पुरस्कार सोहळ्याची जय्यत तयारी सुरु आहे अशी माहिती दिली.

# रत्नागिरी जिल्हा ड्रग्समुक्त करण्यासाठी जनतेचे सहकार्य आवश्यक

## महिलांच्या सुरक्षतेसाठी पोलीस दल आग्रही राहील

### पोलिस अधीक्षक नितीन बगाटे यांची ग्वाही

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी):-**
रत्नागिरी जिल्हा ड्रग्स मुक्त करावयाचा आहे. यासाठी जनतेचे सहकार्य आवश्यक आहे. जो कोणी विकत असेल त्याची गाठ पोलिसांशी आहे. त्यांचं कंबरडे मोडणार, प्रसंगी आपण स्वतः छापा टाकू, असा इशारा देतांना सांस्कृतिक, कला, क्रीडा क्षेत्रात अग्रेसर असलेल्या शांततामय रत्नागिरी जिल्ह्याला गालबोट लागणार नाही, यासाठी आपले शेवटपर्यंत प्रयत्न राहतील, असे स्पष्टपणे रत्नागिरी जिल्हा पोलिस अधीक्षक नितीन बगाटे यांनी चिपळूणमध्ये आयोजित सामाजिक सलोखा बैठकीत सांगितले. ही सभा कापसाळ येथील माटे सभागृहात पार पडली. यावेळी नागरिकांनी काही समस्या मांडल्या. या समस्यांचे निराकरण केले जाईल, असे बगाटे यांनी यावेळी सांगितले. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार सदानंद चव्हाण, वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव, उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने, पोलीस निरीक्षक फुलचंद मेंगडे आदी पोलीस अधिकारी उपस्थित होते. यावेळी श्री. बगाटे म्हणाले की, सामाजिक सलोखा सभेला तुमच्या सर्वांची उपस्थिती पाहून तुम्हाला सॅल्यूट आहे, अशा शब्दांत आपली चिपळूणवासीयांसाठी प्रती भावना व्यक्त केली. इतरत्र सेवा बजावीत असतांना सोबत लाठी असायची. मात्र, रत्नागिरी जिल्ह्यात आल्यावर लाठी बाजूलाच ठेवली आहे. इतका हा जिल्हा शांततामय आहे, असे सांगितले. ते आणखी पुढे म्हणाले की, इथल्या समाजाला जबाबदारीचं भान आहे, ही बाब कौतुकास्पद आहे. एकमेकांशी संवाद कायम रहावा, बैठका व्हाव्यात, यासाठीच सामाजिक सलोखा सभा असून यातून एकमेकांमध्ये सलोखा वाढणार आहे. तुम्ही कधीही बोलवा, आपण येऊ असे सांगताना तुमचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न राहतील, अशी ग्वाही पोलिस अधीक्षक नितीन बगाटे यांनी यावेळी दिली. महिलांच्या सुरक्षिततेच्या




दृष्टीने पोलीस नेहमीच आग्रही राहतील. तर पोलीस दलात कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने खेर्डी येथील पोलीस चौकी सुरू करण्याच्या दृष्टीने नियोजन करू असे सांगताना दुकानदारांनी आपल्या दुकानातील सीसीटीव्ही कॅमेरे रस्त्याच्या बाजूने फिरतील यासाठी लक्ष द्यावे. जेणेकरून तपासाच्या दृष्टीने पोलिसांना मदत होईल. पोलीस वसाहतीच्या इमारतीच्या गळती संदर्भात लवकरच निधीच्या माध्यमातून ही गळती काढण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे सांगितले. याचबरोबर धूम स्टाईल वाहनधारकांवर कारवाई करण्याबरोबरच मोठे सायलेन्सर बसून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या वाहनधारकांवर देखील कडक कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले. वाहतूक कोंडीबाबत देखील धोरण ठरविले जाईल, असे सांगितले. पोलीस दल जनतेसोबत असून जनतेने देखील पोलिसांना सहकार्य करावे असे, शेवटी आवाहन केले. यावेळी वाशिष्ठी डेअरीचे चेअरमन प्रशांत यादव यांनी आपल्या मनोगतात पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या वाटचालीची माहिती दिली. शिक्षण व योग्य दिशेची समाजाला गरज आहे. समाजाला विचारधारेच्या दृष्टीने तुम्ही पुढे न्याल, असा विश्वास व्यक्त केला. चिपळूण नगरी सांस्कृतिक, कला, क्रीडा जोपासणारी आहे. महाराष्ट्रात सामाजिक सलोखा जपणारा म्हणून चिपळूण तालुका नेहमीच अग्रेसर राहिला आहे. पोलीस दलाला चिपळूणवासीयांचे नेहमीच सहकार्य असते आणि ते पुढे राहील, अशी ग्वाही यादव यांनी यावेळी दिली. माजी आमदार सदानंद चव्हाण, माजी सभापती शौकत मुकादम यांनी देखील आपली मनोगते मांडली. यावेळी माजी नगरसेवक किशोर रेडीज, सामाजिक कार्यकर्ते प्रकाश पवार, नितीन चोरगे, नित्यानंद भागवत, श्रीधर भुरण, शहानवाज शाह, प्रभाकर चितळे यांनी चिपळूणमधील समस्यांवर प्रकाशझोत टाकला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे चिपळूण तालुका अध्यक्ष नितीन ठसाळे, जयद्रथ खताते, उद्योजक केतन पवार, सुरेश सावर्डेकर, समीर काझी, मुराद अडरेकर, बाळकृष्ण जाधव, मिलिंद कापडी तसेच बहुसंख्येने महिला भगिनी देखील उपस्थित होत्या. या सभेचे प्रास्ताविक उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने यांनी सूत्रसंचालन शाहिद खेरटकर यांनी केले. तर आभार पोलीस निरीक्षक फुलचंद मेंगडे यांनी मानले.

# रिठद ते पार्डीतिखे प्रजिमा ५९ या रस्त्यावर मुरूम टाकणे गरजेचे!,

## वरिष्ठ अधिकाऱ्याचेही या रस्त्याकडे दुर्लक्ष, परंतु शेतकऱ्यांचे हाल कायम!

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर**
रिसोड तालुक्यातील रिठद ते गोवर्धन प्रजिमा ५९ या रस्त्यामधील रिठद ते पार्डी तिखे हा रस्ता दोन वर्षांपूर्वी इतर जिल्हा मार्ग म्हणून होता. या रस्त्यावर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून माती काम पूर्ण करून हा रस्ता सार्वजनिक बांधकाम उप विभागाकडे वर्ग करण्यात आला.रिठद ते पार्डीतिखे या रस्त्याचे खडीकरण, डांबरीकरण व आवश्यक असलेल्या पुलाचे काम होणे बाकी आहे. परंतु या सर्व कामासाठी येणाऱ्या निधीला वेळ लागणार असल्याने शेतकऱ्यांना शेतात पेरणीसाठी/ मशागतीसाठी जाण्यासाठी खूपच त्रास होत आहे. या रस्त्यावर खडीकरण होणे गरजेचे आहे परंतु दुरुस्ती करणेही गरजेचे आहे. त्याकरिता १०० ट्रिप मुरूम टाकणे गरजेचे आहे. या रस्त्यावर संपूर्ण काळी माती असल्याने अनेक खड्डे पडले आहेत. त्या पावसाळ्यात जे खड्डे आहेत त्या खड्ड्यात पाणीच असते त्यामुळे पेरणीसाठी जाता येत नाही. म्हणून दुरुस्ती साठी हा मुरून टाकला नाही तर शेतकऱ्यांना पेरणीसाठी शेतात जाणे मुश्किल होणार आहे. करिता रिसोडच्या सार्वजनिक बांधकाम उपविभागाने दखल घेऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी दुरुस्ती करून देण्यात यावी.

**शेतकरी -हर्षल भागवत बोरकर**
सार्वजनिक बांधकाम विभागाने रिठद ते पार्डीतिखे (००/०५कि.मी.)दरम्यानच्या रस्त्याची दुरुस्ती करून देण्यात यावी जर या रस्त्यावर मुरूम टाकण्यात आला नाही, तर शेतात जाणे कठीण होणार आहे व त्यामुळे पेरणी सुद्धा रखडू शकते.



**शेतकरी... संतोष गजमोल आरु**
रिठद ते पार्डी रस्त्यावर शेतकऱ्याचे अतोनात हाल होत असून शेतकरी खूप यातना भोगत आहे इतके वर्षे रस्ता झाला नाही. आता झाला तरीसुद्धा यातना भोगण्याची वेळ कायम आहे. तरी या पाच किलोमीटरच्या रस्त्यावर मुरूम टाकावा. जर अधिकाऱ्यांनी दखल नाही घेतली तर..." ये रे माझ्या मागल्या " असंच होणार !.

## लोहा तालुक्यातील कार्यालय विविध विकासकामांच्या संदर्भात नगरपरिषद येथे आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या उपस्थितीत आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड - लोहा तालुक्यातील विविध विकास कामासंदर्भात नगरपरिषद कार्यालय, लोहा येथे माझ्या उपस्थितीत सर्व विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीतील विविध विषयावर चर्चा करण्यात आली. या बैठकीपूर्वी नगरपालिका कार्यालय परिसरातील महात्मा_बसवेश्वर_महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करून वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष कल्याण सावकार सूर्यवंशी, माणिकराव मुकदम, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस तथा प्रवीण पाटील चिखलीकर, माजी नगराध्यक्ष पंचशील कांबळे, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, छत्रपती धुतमल, केशवराव मुकदम, माजी नगरसेवक करीम शेख, बालाजी खिल्लारे, हरिभाऊ चव्हाण, भास्कर पवार, तहसीलदार रामेश्वर गोरे, तहसीलदार विठ्ठल परळीकर, मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे, गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता मोहन पवार यांच्यासह अनेक अधिकारी, पदाधिका-यांची उपस्थिती होती.




## सणसर गावात संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाचे काम जोरदार सुरु

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सणसर गावात सध्या संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग चे काम जोरदार सुरु करण्यात आले आहे.बरेच दिवस झाले इंदापूर तालुक्यातील भवानीनगर, सणसर भागातील संत तुकाराम महाराज पालखी महामार्गचे काम रखडलेले असून काम करणाऱ्या ठेकेदाराला वेळोवेळी प्रशासन व गावकरी यांनी विनंती करून सुद्धा काम पाहिजेत तेवढ्या गतीने होत नसल्याने त्यांच्याबदल नाराजी व्यक्त केली जात होती. यामुळे मागील महिन्यापासून काम करत असलेले ठेकेदार यांनी आपली जवळपास सर्व यंत्रणा सणसर गावात कामासाठी वापरत असून जोरदार दर्जेदार काम चालू केल्याची माहिती मिळाली आहे.काम सुरु झाल्यामुळे सणसर गावातील नागरिक ठेकेदार व काम करत असलेल्या कामगार यांच्यावर खूष असल्याच जाणवत आहे.



## शाळा, कॉलेज मधून टि. सी.काढण्यासाठी, कसल्याही प्रकारची फिस लागत नाही. फिस घेणाऱ्यांवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनीधी,**
**बालाजी तेलंगे**



16जून 2025पासून शाळा सुरू होणार असुन काही पालक आपल्या पाल्यांना इयत्ता पहिली वर्गात प्रवेश घेणार आहेत तर काही पालक आपल्या पाल्यांचे प्रवेश पुढील वर्गात घेणार आहेत. ग्रामीण भागात बऱ्याच खेड्यात गावात फक्त इयत्ता चौथी वर्गापर्यंत चे वर्ग असलेली शाळा असते तर काही ठिकाणी फक्त इयत्ता सातवी वर्गापर्यंत, चे वर्ग असलेली शाळा असते. तर काही ठिकाणी फक्त दहावी वर्गापर्यंत चे वर्ग असलेली शाळा असते. या वेळी पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना, टी. सी. म्हणजेच शाळा सोडण्याचे प्रमाण पत्राची गरज असते. अशा वेळी आपली टी. सी. काढण्यासाठी कसल्याही प्रकारची फीस शाळेला, कॉलेज ला, घेण्याचा अधिकार नाही. हा नियम जिल्हा परिषद शाळेसाठी, खाजगी अनुदानित शाळेसाठी,विनाअनुदानित, शाळा मराठी माध्यमासाठी, लागू आहे. असे असताना जर शाळेने, टी. सी. साठी पालकांकडे,विद्यार्थ्याकडे, फिसची मागणी केली असता तक्रार आल्यास त्या शाळेवर, जबाबदार व्यक्तीवर कारवाई केली जाईल, असे उदगीर येथील गट शिक्षण अधिकारी शेख यांनी पालकांना, विद्यार्थ्यांना आव्हान केले आहे.

# श्री ज्योतिर्लिंग विद्यालय जिंती येथे विविध शासकीय दाखल्याचे वितरण कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सातारा वार्ताहर**

जिंती,ता. कराड, ग्रामीण विकास शिक्षण संस्था उंडाळेचे, श्री ज्योतिर्लिंग विद्यालय जिंती ता. कराड जि. सातारा या विद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत कराड तहसील महसूल विभागामार्फत विद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. शैक्षणिक वर्ष 2025 26 पासून इयत्ता अकरावीचा प्रवेश ऑनलाईन केल्याने या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना विविध दाखल्यांची आवश्यकता असते जसे की जातीचा दाखला डोमासाईल सर्टिफिकेट उत्पन्न दाखला डोंगरी दाखला अल्पभूधारक शेतकरी दाखला अशा प्रकारचे दाखले प्रांत कार्यालय व तहसीलदार कार्यालय कराड यांच्यामार्फत वितरित केले जातात ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालकांना हे दाखले काढताना त्रास होऊ नये आर्थिक नुकसान होऊ नये त्यांना वेळेत दाखले मिळावेत या हेतूने कराड प्रांत व तहसील कार्यालय,महा-ई-सेवा केंद्र, सेतू कार्यालय व कराड तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये यांच्या संयुक्त प्रयत्नाने विद्यार्थ्यांना दाखले मिळणे सोयीचे झाले व प्रवेश प्रक्रियेपूर्वीच विद्यार्थ्यांच्या हातात दाखले मिळाल्याने पालक वर्गात व विद्यार्थी वर्गात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

कराड तालुक्यातील श्री ज्योतिर्लिंग विद्यालयात शनिवार दिनांक 14 6 2025 रोजी सकाळी दहा वाजता उंडाळे मंडल अधिकारी माननीय संदीप काळेसाहेब व लावंड साहेब उंडाळे केंद्राच्या केंद्रप्रमुख सन्माननीय सौ धनश्री जगताप मॅडम व जिंती येथील तलाठी कार्यालय कर्मचारी ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंतीचे कार्यकर्ते श्री श्रीकांत साळुंखे जिंती यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना विविध शासकीय दाखल्यांचे




वितरण करण्यात आले. यावेळी मोठ्या प्रमाणात जिंती, महारुडेवाडी, अकाईवाडी येथील विद्यार्थी व पालक यांची उपस्थिती होती. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाबाबत उंडाळे मंडल अधिकारी माननीय श्री संदीप काळे साहेब यांनी माहिती दिली व आणखीन काही दाखल्याच्या संदर्भात अडचणी आल्यास ती सोडवण्याबाबत मार्गदर्शन केले. कराड तहसील व प्रांत कार्यालयाच्या वतीने पालक व विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असे सांगण्यात आले. पंचायत समिती शैक्षणिक विभाग कराड उंडाळे केंद्राच्या केंद्रप्रमुख माननीय धनश्री जगताप मॅडम यांनी शासकीय कार्यालयाने व सेतू कार्यालयाने व विद्यालयाच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना दाखले प्राप्त करून देण्याच्या कामात समन्वय साधून दाखल्यांसाठी लागणाऱ्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास सहकार्य केल्याबद्दल श्री ज्योतिर्लिंग विद्यालयातील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी व लिपिक श्री विजय धाईगडे यांना धन्यवाद दिले व विद्यार्थी, पालकांचे अभिनंदनही केले. शिक्षण विभाग, शासन विभाग विद्यार्थ्यांच्या सदैव पाठीशी असून विद्यार्थ्याने आपले उत्तम करिअर घडवावे अशा शुभेच्छाही दिल्या. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री अशोक कोठावळे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले, कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या उपशिक्षिका सौ वनिता कुंभार मॅडम यांनी केले तर आभार विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक श्री संभाजी खोचरे सर यांनी मानले.

कार्यक्रमास विद्यालयातील उपशिक्षक श्री गणेश तपासे सर, उपशिक्षिका सौ रूपाली माळी मॅडम, लिपिक श्री गणेश साळुंखे सर, सेवक श्री संदीप मोहिते दादा, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## पनवेल महानगरपालिकेच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांची तत्परता आणि एक जीव वाचला

### पोखलेणखाली अडकलेला कामगार सुखरूप बाहेर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

: सेक्टर 6ए येथील जय श्रीकृष्ण कन्स्ट्रक्शन साइटजवळील धन्वंतरी हॉस्पिटल शेजारी एका पोखलेण मशीनखाली अडकलेल्या व्यक्तीला महापालिकेच्या अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. माजी नगरसेवक सतिश पाटील यांनी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांना या घटनेची माहिती दिली. कैलास गावडे यांनी तातडीने अग्निशमन दलाचे श्री बोडके तसेच संबंधित प्रभाग अधिकारी आणि वैद्यकीय टीमला सूचना दिली. श्री बोडखे यांनीही तातडीने सर्व यंत्रणा सजग केली. अवघ्या पाच मिनिटात अग्निशमन दलाची यंत्रणा अपघातस्थळी पोहोचली आणि एक जीव वाचला.

घटनास्थळी पोहोचल्यावर जय श्रीकृष्ण कन्स्ट्रक्शन साइटवरील पोखलेण मशीनखाली अडकलेल्या विक्रम लंबाटे (साईट सुपरवायझर) यांना अग्निशमन जवानांनी हायड्रॉलिक स्प्रेडरच्या सहाय्याने त्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले. जखमी अवस्थेत त्यांना त्वरित म्ब्युलन्सद्वारे एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या रेस्क्यू मोहिमेत उपअग्निशमन अधिकारी मनीष ब्राह्मणकर यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई पार पडली. घटनास्थळी कळंबोली पोलिस ठाण्याचे एपीआय श्री. ननावरे यांचीही उपस्थिती होती. ही संपूर्ण कारवाई अवघ्या काही मिनिटांत यशस्वीपणे पार पडली. यामागे पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी कर्मचारी यांची आपत्ती काळातील कार्य तत्परता व समन्वय महत्त्वाचा ठरला. या बाबत आयुक्त मंगेश चितळे यांनी अधिकारी -कर्मचारी यांचे अभिनंदन करून समाधान व्यक्त केले.



# मुरुडच्या शेळ्या मेंढ्या बाजारात शेतकऱ्याची, व्यापाऱ्याची आर्थिक लुट... ?

### "क्या हुआ तेरा वादा"उपसरपंच दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होणार का ?

**दैनिक युवक आधार**
**लातूर प्रतिनिधी -**
**मोहम्मद पिंजारी**

लातूर तालुक्यामध्ये मागील काही महिन्यापूर्वी मुरुड शहरातील सुप्रसिद्ध असलेला आठवडी शेळ्या मेंढ्याचा बाजार अनेक वर्षापासून अविरत कार्यरत असल्यामुळे शहराची व जिल्ह्याचे नाव लौकिक होत आहे. परंतु काही दिवसापूर्वी गुत्तेदारांकडून होणाऱ्या नाहक त्रासामुळे बाजारातील व्यापाऱ्यांनी बाजार सोलापूरला स्थलांतरित करण्यात आला होता, त्यानंतर स्थानिक प्रशासन व गावातील प्रतिष्ठित व्यक्तींनी व्यापाऱ्यांची मनधरणी करून बाजार पूर्ववत सुरू केला. मात्र गुत्तेदारांकडून आणखीनही त्याच प्रमाणात बाहेर जाऊन अघोरी वसुली चालू असल्याचे भन्नाट चर्चा या मुरुड शहरांमध्ये चालू असल्याचे निदर्शनास आले .संपूर्ण महाराष्ट्रात लातूर जिल्ह्यातील मुरुड चा बाजार हा शेळ्या मेंढ्याचा बाजार म्हणून नाव चर्चित असून याला तडा देण्याचे काम मात्र गुत्तेदार होताना पाहावयास मिळत आहे. व्यापाऱ्यांना पार्किंगच्या नावाखाली लहान वाहनासाठी शंभर रुपये तर मोठ्या ट्रॅव्हल्स साठी 200 ते 300 रुपये आकारात असल्याचे निदर्शनास आले असुन कोणत्या शासन निर्णय अन्वये हे प्रकार चालू आहेत असे अनेक प्रश्न व्यापाराच्या व शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होताना दिसत आहे. व्यापाऱ्यांनी प्रशासनाने दिलेल्या नियमांची पायमल्ली होत असल्याची खंत व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. तसेच गुत्तेदारने नगा प्रमाणे वसुली न करता अंदाजे मोठ्या वाहाणासाठी तीन हजार ते पाच हजार अशी रक्कम लावत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले यावर कसल्याही प्रकारचे अंकुश नसल्याचे दिसून येत आहे. काही व्यापाऱ्याच्याचे असे म्हणणे की,क्या हुआ तेरा वादा ? अशी म्हणण्याची वेळ व्यापाऱ्यावर व शेतकऱ्यावर येत आहे. मात्र यावर अंकुश आणावे व अशी मागणी व्यापाऱ्याकडून होत आहे.

चौकट

" मुरुडच्या उपसरपंचांनी व्यापाऱ्यांना दिलेले आश्वासनाची पूर्तता करत नसल्याचेही बोलन दाखवले जसे की दरचे बॅनर व सुविधा देण्याबाबत उदासीनता दिसून येते " मुरुडचे उपसरपंच यांनी आश्वासन दिले होते की दर पत्रकाचे बॅनर व पार्किंगचे पैसे घेण्यात येणार नाही मात्र त्या आश्वासनांना विसर पडल्याचे दिसून आले ?



## भारती विद्यापीठ आय एम एस आर आणि आय एस टी डी आयोजित कार्यशाळा .

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च च्या ऑपरेशनस क्लब आणि इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट नवी मुंबई आयोजित " डेटा एनालीटिक्स इन ऑपरेशनः मॅनेजमेंट ग्रॅज्यूट क्लासरूम टू रिअल वर्ल्ड इम्पॅक्ट" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा दि. १४/०६ /२०२५ आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अंजली कळसे यांनी कार्यक्रमाचे उदघाटन करून ह्या नावीन्यपूर्ण उपक्रमास शुभेच्छा दिल्या. भार्गवी अती,अक्सेंचुअर,मुंबई आणि माजी विद्यार्थी, बीव्हीआयएमएसआर,नवी मुंबई ह्यांनी प्रशिक्षणार्थीना विविध प्रकारच्या डेटा एनालीटिक्स आणि त्याचा उपयोग ऑपरेशनमध्ये कसा करायचा आणि उद्योगाच्या यशात योगदान कसे द्यायचे या विषयावर मार्गदर्शन केले आणि शंकाचे निरसन केले. मुख्य आयोजक डॉ.कुलदीप भालेराव,मुख्य मार्गदर्शक-ऑपरेशनस क्लब आणि सचिव,आय एस टी डी नवी मुंबई ह्यांनी उपक्रम राबवण्यासाठी केलेल्या मार्गदर्शनासाठी भारती विद्यापीठ नवी मुंबई कॉम्प्लेक्सचे संचालक, डॉ. विलासराव कदम,महाविद्यालयाच्या संचालिका डॉ. अंजली कळसे आणि आय एस टी डी नवी मुंबईच्या अध्यक्षा डॉ.वैशाली पाटील यांचे आभार व्यक्त केले.एकदिवसीय कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी निकिता शिनेत्रे, यश संखे,विवेक मांडके, नेहा परिमल,कार्तिक घरत,श्रेया वामन,अदिती हिरे, सुमित पाटील ह्या विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले आणि उपक्रम यशस्वी केला.



# 'सरकार नव्हे, यंत्रणा बदला!"

आसाराम विरकर
(उपसंपादक दैनिक युवक आधार मराठवाडा आवृत्ती)

निवडणुका झाल्या, सरकार बदललं, मुख्यमंत्रीही बदलले... पण जनता म्हणते – "काहीच बदललं नाही!"

हे का घडतं? कारण सरकार हे फक्त एका बाजूचं चाक आहे. दुसरं महत्त्वाचं चाक म्हणजे प्रशासकीय यंत्रणा – आणि ती जर कोसळली असेल, तर सरकार कितीही चांगलं असलं तरी गाडी पुढे जाणार नाही.

आपल्या देशातील बहुतांश जनतेचा अनुभव असा आहे की, सरकारी कार्यालयात गेल्यावर पहिल्यांदाच अडचण सुरू होते. फाईल गायब, काम प्रलंबित, लाच मागितली जाते – आणि हे सगळं *"पद्धतशीर"*पणे! ही परिस्थिती केवळ सरकारमुळे नव्हे, तर सिस्टममध्ये घर करून बसलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे आहे.

**सर्वच अधिकारी भ्रष्ट नाहीत**

अर्थातच, सर्वच अधिकारी व कर्मचारी भ्रष्टाचारी आहेत, असे म्हणणे अयोग्य ठरेल. अनेक प्रामाणिक, कर्तव्यदक्ष आणि जनतेसाठी झटणारे अधिकारी अजूनही आपला सन्मान टिकवून आहेत. कुणी उन्हात रस्त्यावर उभं राहून वाहतूक नियंत्रण करतो, कुणी तासंतास रुग्णालयात उपचार करतो, कुणी दिवसभर शेती योजनेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी धडपडतो.

पण प्रश्न आहे – या सज्जन अधिकाऱ्यांना काम करायला विरोध कोण करतो? उत्तर स्पष्ट आहे – आतूनच भ्रष्ट झालेली व्यवस्था. ही वाळवी थेट फायलींपासून लोकांच्या नशिबापर्यंत सगळं पोखरून टाकते.

**यंत्रणेमध्ये बसलेले "खडे"**

अनेकजण केवळ "नोकरशाही" या शब्दाचा आधार घेऊन स्वतःला बिनधास्त बनवतात. त्यांना माहिती असतं – त्यांच्यावर कुठलीही कारवाई होणार नाही. कारण त्यांनी काळजीपूर्वक असा भ्रष्ट संबंधांचा जाळं विणलेलं असतं की त्यांना हलवणं अशक्यप्राय होतं. हे खडे फक्त गाडी अडवत नाहीत, तर तिचा प्रवासच मोडून टाकतात. शासनाच्या चांगल्या योजनाही वेळेवर पोहचत नाहीत, सामान्य नागरिक त्रस्त होतो आणि मग लोकशाहीप्रती विश्वास ढासळतो.

**बदल हवा, पण तो मुळापासून**

केवळ सरकार बदलून काहीही होणार नाही. यंत्रणा साफ करणं गरजेचं आहे. प्रशासनात असलेल्या भ्रष्ट अधिकाऱ्यांची ओळख करून, त्यांना सेवेतून हाकलणं हाच खरा बदल आहे. त्यासाठी तक्रारींची यंत्रणा पारदर्शक असायला हवी. भ्रष्टाचार सिद्ध झाल्यास कठोर शिक्षेसोबतच सार्वजनिक नामोल्लेखही झाला पाहिजे. त्याचवेळी योग्य कर्मचाऱ्यांचा गौरवही सार्वजनिकरित्या झाला पाहिजे.

**योग्यतेचा सन्मान हाच स्फूर्तीचा स्रोत**

एक आदर्श शिक्षक, एक इमानदार तहसीलदार, एक तत्पर तलाठी, एक सच्चा पोलिस अधिकारी – यांना समाजासमोर ठेवायला हवं. शासनाने अशा कर्मचाऱ्यांना "प्रशासन रत्न" सारख्या पुरस्कारांनी गौरवून त्यांचा सन्मान केला पाहिजे. त्यांच्या कहाण्या समाजात पोहचल्या पाहिजेत. कारण प्रेरणा तिथूनच मिळते – आणि तीच प्रेरणा भविष्यातला नवीन अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचारी न होता सच्चा सेवक बनवते.

**5 ट्रिलियन इकॉनॉमीकडे वाटचाल**

भारताचं स्वप्न आहे – 5 ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनण्याचं. पण हे स्वप्न फक्त उद्योगपती किंवा स्टार्टअप्सच्या जोरावर पूर्ण होणार नाही.

प्रशासन कार्यक्षम नसेल, तर गुंतवणूकदारही पळून जातील.

त्यामुळे भ्रष्टाचारमुक्त, पारदर्शक आणि गतिशील प्रशासकीय यंत्रणा हीच खरी गती आहे या स्वप्नाच्या दिशेने.

सरकार बदलून उपयोग नाही, जर व्यवस्था तशीच असणं ठरलेलं असेल.

**प्रशासन म्हणजे "सेवा", सत्तेचा दुरुपयोग नव्हे.**

भ्रष्ट अधिकाऱ्यांना ठोस कारवाईने बाहेर फेकायला हवं, आणि उत्तम अधिकाऱ्यांना उत्तम सन्मानाने पुढे आणायला हवं. हे केल्याशिवाय "विकसित भारत" ही संकल्पना फक्त भाषणातच ऐकायला मिळेल, प्रत्यक्षात नाही.

**आसाराम विरकर**
**(उपसंपादक दैनिक युवक आधार मराठवाडा आवृत्ती)**

## राष्टवादी काँग्रेस पक्षाच्या (अजितदादा पवार गट) समाजिक न्याय विभाग परतुर तालुका अध्यक्ष पदी प्रभाकर प्रधान यांची निवड.....

**दैनिक युवक आधार**
**परतूर- जालना**
**अशोक ठोके**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या(अजित दादा पवार गट) सामाजिक न्याय विभागाच्या परतुर तालुका अध्यक्षपदी प्रभाकर प्रधान यांची निवड जिल्हा अध्यक्ष अरविंदजी चव्हान यांच्या नेत्तुवाखाली समजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष प्रभाकर घेवंदे यांनी निवक्ती पत्र देवून केली.यावेळी अल्पसंख्याक सेलचे महाराष्ट प्रदेश उपाध्यक्ष खय्युम खान, परतुर तालुका अध्यक्ष विठ्ठलराव



बरकुले, ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हनुमंत दंवडे, अनस खान यांची उपस्थिती होती.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## मावळ तालुक्यात कुंडमळा येथील लोखंडी पूल पडून 25 ते 30 लोक इंद्रायणी नदीत बुडल्याची शक्यता.

**दैनिक युवक आधार**
**संतोष लांडे पुणे**

तळेगाव दाभाडे शहराजवळील शेलारवाडी जवळील प्रसिद्ध पर्यटनस्थळ कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवर असलेला जूना लोखंडी पूल कोसळला आहे. ह्या दुर्घटनेत अनेक पर्यटक नदीत पडले असून त्यांना वाचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. रविवार सुटीचा दिवस असल्याने कुंडमळा पर्यटनस्थळी पर्यटकांची मोठी गर्दी होती, अशात पूल कोसळून अनेक पर्यटक इंद्रायणीत बुडाल्याची भीती आहे. घटनेची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक पोलीस, ग्रामस्थ आणि आपदा मित्र यांनी घटनास्थळी धाव घेतली असून बचावकार्य सुरू करण्यात आले आहे.दोन दिवसापासून मावळ परिसरात मुसळधार पाऊस पडत असून इंद्रायणीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे यामुळे नदीत पडलेल्या पर्यटकांना वाचविण्याचे शर्तीचे प्रयत्न यंत्रणाकडून सुरु आहेत अजिंक्य महाराष्ट्र न्यूज सोबत प्रतिनिधी गोपाळ भालेराव पुणे





# होमगार्ड समादेशक मकरंद जोशी यांना पलटन नायक रँकवर पदोन्नती

## वरिष्ठांकडून शिस्तशीर व गुणवत्तापूर्ण सेवेची दखल

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धनः प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्याचे होमगार्ड समादेशक मकरंद जोशी यांना पलटन नायक या रँकवर पदोन्नती मिळाली आहे. त्यांच्या शिस्तशीर व गुणवत्तापूर्ण सेवेची दखल घेऊन जिल्हा होमगार्ड समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्या आदेशानुसार त्यांची ही पदोन्नती करण्यात आली आहे. रविवारी (दि. १५) दिवेआगर येथे आयोजित कार्यक्रमात मकरंद जोशी यांना पलटन नायक ही रँक बहाल करण्यात आली. याप्रसंगी डॉ. उंड्रे इंग्लिश मिडीयम स्कूलचे शिक्षक वाहिद खान, शिक्षिका सौ.खान, पत्रकार साहिल रेळेकर, दिघी सागरी पोलीस ठाण्याचे हेड कॉन्स्टेबल शेखर कांबळे, पोलिस अंमलदार जिग्नेश चांदणे, संदेश पवार आदींसह मान्यवर उपस्थित होते.



मकरंद जोशी हे २००८ सालापासून होमगार्ड विभागात कार्यरत आहेत. सेवा कालावधीत त्यांनी अतिशय कडक शिस्त, समर्पण व उल्लेखनीय कार्याचा वेळोवेळी परिचय दिला आहे. त्यांच्या कार्यशैलीमुळे ते अनेक सहकाऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरले आहेत. विशेष म्हणजे, त्यांना देशसेवेची नितांत ओढ असून त्यांचा अनुभव आणि सेवाभाव त्यांच्या कार्यशैलीत स्पष्टपणे जाणवतो. पदोन्नतीनंतर त्यांच्यावर अधिक जबाबदारी असलेली भूमिका आली असली, तरी ती समर्थपणे पार पाडण्याची त्यांची तयारी असल्याचे त्यांनी सांगितले. मकरंद जोशी यांनी आजपर्यंत म्हसळा तालुका होमगार्ड समादेशक म्हणून जिल्ह्यातील अनेक बंदोबस्त, आपत्ती व्यवस्थापन व विशेष मोहिमांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्यांच्या नियोजनबद्ध, शिस्तबद्ध व उल्लेखनीय कामगिरीमुळे अनेकवेळा वरिष्ठांची प्रशंसा मिळाली आहे. त्यांच्या या यशाबद्दल व पदोन्नतीबद्दल सहकारी आणि स्थानिक नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत असून, पुढील काळातही त्यांच्याकडून अशीच उल्लेखनीय कामगिरी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

कोटः

"या यशाचे श्रेय वेळोवेळी लाभलेल्या वरिष्ठांचे मार्गदर्शन, सहकाऱ्यांची साथ आणि पत्नी प्रीती यांचे पाठबळ यांना आहे. पुढील दोन महिन्यांत मी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असलो, तरी या क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या युवकांना सदैव मार्गदर्शन करत राहीन आणि अखेरच्या श्वासापर्यंत देशसेवेची निष्ठा जपत राहीन, ही माझी ग्वाही आहे."

– **मकरंद जोशी, पलटन नायक**

## जोगेश्वरीत राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त फळ वाटप कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - किशोर रमाकांत गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष, मराठी अस्मितेचे प्रतीक आणि हजारो युवांचे प्रेरणास्थान सन्माननीय राजसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेना (जोगेश्वरी पूर्व) आणि महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेना यांच्या संयुक्त विद्यमाने एक समाजोपयोगी उपक्रम – फळवाटप कार्यक्रम – आयोजित करण्यात आला. हा कार्यक्रम हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रामा केअर मनपा रुग्णालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथे पार पडला. या उपक्रमात रुग्ण, त्यांच्या नातेवाईक तसेच रुग्णालय कर्मचाऱ्यांना ताज्या फळांचे वाटप करण्यात आले. राजसाहेबांचा वाढदिवस जल्लोषात न साजरा करता, सामाजिक बांधिलकी जपत जनसेवेमार्फत साजरा करण्याचा हेतू या उपक्रमामागे होता. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन श्री. जितेंद्र पाटील (जिल्हाध्यक्ष, रायगड व अध्यक्ष – महाराष्ट्र नवनिर्माण रेल्वे कामगार सेना), श्री. निलेश दूर्वांस खोत (सचिव – मुंबई विभाग), माजी नगरसेवक भालचंद्र अंबुरे (आप्पा), तसेच अनेक कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी मिळून केले.

या वेळी अनेक मनसे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते, नवनिर्माण सेनेचे युवा सदस्य यावेळी शाखाध्यक्ष श्री. विनोद शिंदे, मनसैनिक श्री. निलेश मांगडे, श्री. प्रकाश टोपले, श्री. प्रवीण बोरकर, श्री. मेहबूब भाई, कु. सोनाली पाटील,गणेश पितळे उपस्थित होते या उपक्रमामुळे  कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्थानिक रहिवाशांनी आणि रुग्णालय प्रशासनाने मनसे पदाधिकाऱ्यांचे आभार मानले.













## शुभमंगल करायचंय? एजंट, दलालांपासून सावध राहा!

### विवाहाच्या नावाखाली फसवणुकीचे प्रकार वाढले; पोलिसांचा इशारा

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**विंचूर** :- लग्न हे केवळ दोन व्यक्तींमधील नव्हे, तर दोन कुटुंबांमधील पवित्र बंधन असते. मात्र अलीकडच्या काळात या नात्याच्या नाजूक भावनांचा गैरफायदा घेत, विवाहाच्या नावाखाली आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढले आहेत. विशेषतः ऑनलाईन विवाह संस्थांपासून ते स्थानिक एजंट, दलाल, भोंदू बाबा आणि काही तथाकथित विवाह मंडळांच्या माध्यमातून वधूपित्यांची लूट सुरू आहे.

'उत्कृष्ट स्थळ आहे', 'लगेच जुळवणी करू शकतो' अशा आमिषांना भुलून पालक लाखो रुपये देतात. काही वेळा प्रत्यक्ष स्थळ दाखवून 'संपर्कात आहोत', 'लग्न जुळलंच आहे' असे सांगितले जाते. मात्र एकदा पैसे घेतल्यावर संबंधित एजंट किंवा दलालांचे फोन बंद होतात.

यामुळे फसवले गेलेले पालक अखेर पोलिस किंवा न्यायालयाचा दरवाजा ठोठावतात. तालुक्यातील काही गावांमध्ये अशा घटनांचे प्रमाण वाढले असून, विशेषतः वय ओलांडलेली मुले–मुली, प्रेमविवाह करू इच्छिणारी जोडपी, तसेच शहरात राहणाऱ्या पण ग्रामीण पार्श्वभूमीच्या कुटुंबांना लक्ष्य केले जात आहे. बनावट वेबसाइट्स, फसवी 'मैत्री संस्था', खोटे लग्नमेळावे यांच्या माध्यमातून हजारोंची फसवणूक होत आहे. मात्र इज्जत वाचावी म्हणून पालक पोलिस तक्रार करण्यास धजावत नाहीत.

**फसवणुकीचे सामान्य प्रकार**

बनावट विवाह मंडळांमार्फत स्थळ दाखवून पैसे घेणे, वेबसाईट किंवा सोशल मीडियावर बनावट प्रोफाइल तयार करून विश्वास संपादन करणे, 'लग्न जुळवतो' म्हणून थेट भेटी आणि भेटवस्तूंच्या नावाने पैसे घेणे, संपर्क झाल्यानंतर अचानक मोबाईल नंबर बंद करणे.

**सावध राहा, फसवणूक टाळा!**

विश्वासू व स्थानिक ओळखीच्या लोकांमार्फतच स्थळ जुळवा, कुठल्याही आर्थिक व्यवहारापूर्वी संबंधित व्यक्तीची पार्श्वभूमी तपासा, पोलिसांकडून नोंदणी, विवाह मंडळाचे परवाने आणि त्यांची अधिकृतता पडताळा, कोणतीही शंका असल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधा. "अनोळखी मध्यस्थ, एजंट किंवा संस्थांवर विश्वास ठेवण्याआधी सतर्क रहा. विवाह नोंदणीची प्रक्रिया अधिकृतपणे पार पाडा. कोणतीही ओळख वा दस्तऐवज न तपासता कुणाशीही आर्थिक व्यवहार करू नका."

**भास्करराव शिंदे,**
**सहायक पोलीस निरीक्षक, लासलगाव**

## शिवसेना ठाकरे गटाचे सुरज भुसारे अनसिंग यांनी 30.ते 35.कार्यकर्त्यांसह शिवसेनेच्या शिंदे गटात केला प्रवेश.



**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशिम –जिल्ह्यात शिवसेनेच्या ठाकरे गटाला गळती लागली असून वाशिम तालुक्यातील निष्ठावान कार्यकर्त्यांनी पक्षाचा राजीनामा देत केला शिवसेना शिंदे गटात प्रवेश. हा पक्षप्रवेश सोहळा आमदार भावनाताई गवळी यांच्या नेतृत्वात पार पडला. या कार्यक्रमाला जिल्हाप्रमुख विजय खानझोडे तालुकाप्रमुख परम मुसळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या पक्षप्रवेशामुळे वाशिम तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता आहे. प्रवेश करता मध्ये युवक सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक पातळीवर प्रभावी नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीचा समावेश आहे. हे कार्यकर्ते आधी शिवसेना ठाकरे गटामध्ये सक्रिय होते. शिवसेनेत युवा उपजिल्हाप्रमुख सुरज भुसारे.डॉ मारुती वाबळे गजानन वल्हेकर. पंढरी गायकवाड रामु भुसारे माजी पंचायत समिती सदस्य. चंदन धोंगडे भारत मोठा गजानन भुसारे हनुमान कलापुरे संजय आहेर अविनाश भुसारे गोपाल दंडे मयूर चारोळे गणेश वऱ्हाडे अनिकेत पवार विठ्ठल वाबळे विलास वाबळे या सर्वांनी आमदार भावनाताई गवळी यांच्या नेतृत्वावर विश्वास दर्शवत शिवसेना पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी आमदार गवळी यांनी आपले मत व्यक्त करत सांगितले की आजचा पक्षप्रवेश हा शिवसेनेच्या (गवळी गट )बळीकरणासाठी महत्त्वाचा टप्पा आहे. हे सर्व कार्यकर्ते पक्षासाठी मजबूत आधारस्तंभ ठरतील वाशिम तालुक्यात हा विषय चर्चेचा विषय ठरत असून या घटनेमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत शिवसेना अधिक मजबूत स्थितीत उतरेल. असा अंदाज राजकीय विश्लेषक वर्तवत आहे.

# कोण आहेतः रोहित मारणे देशमुख

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे पुणे**

गरज पडली तर आक्रमक भाषण अथवा गरज पडली तर संयमी भाषण शैली असणारे रोहित मारणे देशमुख हे छत्रपती शिवाजीनगरच्या आंदोलनातुन पुणे शहरात प्रसिद्ध झालेल नाव. पुणे शहरात शिवाजीनगर नावाचा परिसर आहे त्याचे नाव बदलुन छत्रपती शिवाजीनगर / छत्रपती शिवाजी महाराज नगर व्हावे या साठी २०२१ साली जो पहिला आवाज ऊठला तो



म्हणजे रोहित मारणे देशमुख यांचा,

२०२१ साली शिवाजीनगर नामांतराचे आंदोलन सर्वप्रथम अखिल भारतीय मराठा महासंघा तर्फे तत्कालीन पुणे शहर विद्यार्थी अध्यक्ष रोहित मारणे देशमुख यांनी चालु केले त्या आंदोलना द्वारे ते पुण्याच्या राजकारणात प्रसिद्धीच्या जोतात आले पुढे जाऊन त्यांनी पुण्येश्वर महादेव मंदिरासाठी सुद्धा आवाज ऊठवला,रोहित मारणे देशमुख यांच्या संकल्पने मधुन हिंदुस्थानाच्या ईतिहासात प्रथमच छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभुषेत आरती झाली व ही कल्पना त्यांच पुणे शहरात फार गाजली व या आरतीचा पण खुप चर्चा गाजली गेली त्यांची आक्रमक व अभ्यासु भाषण शैलीमुळे त्यांची पुणे शहरात हिंदुत्ववादी संघटनांमधे कट्टर हिंदुत्ववादी कार्यकर्ता म्हणुन नविन ओळख निर्माण झाली...! पुणे शहरात अवैधरित्या राहणारे बांग्लादेशी व रोहिंगे या सर्वांचे पोलीस वेरिफिकेशन व्हावे व यांना तात्काळ अटक करून कारवाई करावी या साठी निवेदन देण्यात आले व नंतर पुणे शहरातील एफ.सी. रोड वर या बांग्लादेशी व रोहिंगे हटाव या साठी आक्रमक आंदोलन घेण्यात आले या आंदोलनाचे नेतृत्व युवासेनेचे पुणे शहर सचिव म्हणुन रोहित मारणे देशमुख यांनी केले.तसेच सर्वं सामान्यांच्या मदीतीला धावून जाणारे गोर गरीबांचीं मदत करणारे तसेच शासकीय काहीं कामे न झाल्यास तात्काळ नागरिकांना न्याय मिळवून देणारे रोहीत मारणे देशमुख हे नाव सध्या पुणे शहरात खुप चर्चेत आले आहे

# आम्ही लढणार...आम्ही जिंकणार... हे मिशन घेवून घराघरात जा आपला विजय निश्चित : शिवसेना नेते मा.खा.अनंत गीते

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

आगामी पनवेल महापालिका निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत आपल्याला भगवा फडकावयाचा आहे. यासाठी कार्यकर्त्यांनी आजपासूनच आम्ही लढणार... आम्ही जिंकणार... हे ब्रिद वाक्य घेवून घराघरात जा म्हणजे आपला विजय निश्चित असल्याचे मत शिवसेना नेते मा.खा. अनंत गीते यांनी आज कामोठे येथील आगरी समाज हॉल येथे आयोजित करण्यात आलेल्या मिशन पनवेल महानगरपालिका निष्ठावंत पदाधिकारी मेळाव्यात मार्गदर्शन करताना केले. यावेळी शिवसेना नेते मा.खा.अनंत गीते यांच्यासह शिवसेना उपनेते माजी आमदार सुरेंद्रनाथ (बाळ) माने, शिवसेना उपनेते बबन पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत, शिवसेना रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रसाद भोईर, राज्य संघटक विलास व्हावळ,




जिल्हा समन्वयक अनिल चव्हाण, उपजिल्हा प्रमुख भरत पाटील, उपजिल्हा प्रमुख रामदास पाटील, विधानसभा समन्वयक प्रदीप ठाकूर, महानगर समन्वयक दीपक घरत, महानगर प्रमुख अवचित राऊत, तालुकाप्रमुख ज्ञानेश्वर बडे, शहर प्रमुख रामदास गोवारी, प्रवीण जाधव, सदानंद शिर्के, यतीन देशमुख, सूर्यकांत म्हसकर, प्रदीप केणी, गुरु म्हात्रे, युवासेना जिल्हाधिकारी पराग मोहिते, महिला आघाडी तालुका संघटिका सौ. अनिता डांगरकर, उप तालुका संघटिका सौ. मीना सदरे, उपमहानगर संघटिका सौ, संचिता राणे, सौ.रुपाली कवळे, शहर संघटिका सौ. ज्योती मोहिते, सौ. अपूर्वा प्रभू, सौ. संपदा धोंगडे आदींसह पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना शिवसेना नेते मा.खा.अनंत गीते यांनी सांगितले की, आपल्याला ही निवडणूक कोणत्याही परिस्थितीत जिंकायची आहे यासाठी कोणतीही तडजोड करण्यास आपण तयार राहिले पाहिजे. महाविकास आघाडी होईल किंवा नाही होईल हा नंतरचा भाग आहे. परंतु त्याचा निर्णय पक्षश्रेष्ठी घेतील. परंतु ही निवडणूक सर्व बाजूने आपल्याला लढायची आहे त्यासाठी कार्यकर्त्यांनी आजपासूनच कामाला लागून तशा प्रकारची बांधणीला सुरूवात करायची आहे, तसेच आगामी पनवेल महानगरपालिकेच्या वाढीव प्रॉपर्टी टॅक्स विषय तसेच लोकनेते दि.बा.पाटील यांचे विमानतळाला नाव देण्यात यावे यासाठी शासनाविरोधात एल्गार मोर्चा आयोजित करणार असल्याचे गीते यांनी सांगितले. तर यावेळी बोलताना शिवसेना उपनेते मा.आ.सुरेंद्रनाथ माने यांनी सांगितले की, पनवेल परिसरात शिवसेनेला अनुकूल वातावरण आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत यंदाच्या निवडणुकीत भगवा फडकेल असा विश्वास वाटतोय. यासाठी सर्वांनी मतभेद बाजूला सारुन एकत्र या व मशाल चिन्ह हे घराघरात पोहोचवा असे आवाहन केले. शिवसेना उपनेते बबन पाटील यांनी सुद्धा आवेशपूर्ण भाषणात लोकांचा संपर्क वाढवा, मतदारांकडे जावून त्यांच्या अडीअडचणी जाणून घ्या, लवकरच पनवेल महानगरपालिका संपर्क कार्यालयाचे उद्घाटन पनवेल शहरात करण्यात येईल. येथे लोकांचे प्रश्न सोडवा असे आवाहन केले. तर जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांनी सुद्धा शिवसैनिक ही निवडणूक लढण्यासाठी सज्ज असून सर्व प्रकारचे विभागप्रमुख, शाखाप्रमुख, गटप्रमुख, महिला आघाडी आदींची जोरदारपणे बांधणी सुरू आहे. निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी शिवसैनिक उत्सुक असून पनवेलमधील अनुकूल वातावरण पाहता निश्चितच भगवा फडकेल असा सुद्धा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. शिवसेना रायगड जिल्हा संपर्कप्रमुख प्रसाद भोईर यांनी सुद्धा शिवसैनिकांना मार्गदर्शन करताना सर्वांनी एकजुटीने व उद्धवजींचे हात बळकट करण्यासाठी प्रामाणिकपणे काम करायचे आहे. निवडणुका या जिंकण्यासाठी असतात. त्यामुळे विरोधकांची पळतीभुई करण्यासाठी एकत्र रहा, असे आवाहन सुद्धा त्यांनी केले.

## नंधाना येथे झालेल्या वाऱ्याने व अवकाळी पावसाने झाले सोलर प्लेट चे व शेतकऱ्याचे अतोनात नुकसान.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

सोलर पंप वरिल पाट्या उडून लाब जाऊन जमिनीवर आदळल्या त्यामुळे शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले निसर्गाच्या लहरीं पणचा फटका मात्र सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात अडथळा निर्माण करतोय

आदीच पेरणी करण्यासाठी शेतकरी व्याजाणे पैसा काढून पेरणीसाठी लागनारे साहित्य गोळा करून दमुन गेला त्यातच आता अवकाळी पावसाने केला कहर सोसाट्याच्या वाऱ्याने सोलर पंप च्या पाट्या जमिनीवर पडल्या त्यामुळे शेतकऱ्याचे शेतकऱ्यांचे झाले नुकसान तात्काळ तहसीलदार संबंधित आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी पंचनामे करून अहवाल वरिष्ठाकडे सादर करावा अशी मागणी शेतकऱ्यांमध्ये होत आहे त्यामध्ये शेतकरी 1,राजेश मधुकर देशमुख 2,सुधाकर वसंतराव बोरकर , 3.सुरेश बोरकर 4,संतोष भीमराव बोरकर 5.हरिश्चंद्र श्रीराम बोरकर.असे बरेच शेतकऱ्याचे सोलर पंपच्या पाट्या जमिनीवर पडून सर्व पाट्या मोडल्या हळदीचे पीका करता सोलर हेच एक शेतकऱ्यासाठी वरदान ठरत होती कारण थ्री फेज लाईन ही बरसात असल्याकारणाने व्यवस्थित चालत नाही व हळदीच्या पिंकाला सदैव पाण्याची गरज असल्याने दोन दिवस जरी पाणी न आला तर पिकाची नुकसान होऊ शकते करीत सोलर हळदीचे उत्पादन घेण्यासाठी जीवनावश्य वरदान ठरलेले आहे तरी संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे तात्काळ लक्ष घालून योग्य तो मोबदला शेतकऱ्यांच्या सोलर पंपचा विचार करावा आलेल्या अवकाळी पावसाने काल गोदामावरील पत्रे उडाल्याने तीन ते चार शेतकऱ्यांची खत बियाण्याचे नुकसान झाले तसेच जांब आढाव येथील एका गुराच्या गोठ्यावर वीज पडून कोठ्याला आगलागुन जुळवून भस्मसात झाला व शेतकऱ्याचे स्पिंकलर पाईप ड्रिप साहित्य शेती उपयोगी वस्तू जळून खाक झाले त्याचे ही पंचनामे करून अहवाल सादर करावा व सर्व सर्वांना त्वरित मदत मिळावी अशी मागणी करण्यात येत आहे.



गोठ्यावर वीज पडून शेतकऱ्याचे तीन लाख रुपयांचे आर्थिक नुकसान.
रिसोड तालुक्यातील जांब आढाव येथील घटना.